# विदर्भ प्रजासत्ताक

दीपावली निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा..!

RNI No. MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२५० ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.१ नोव्हेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -८


## भाजपचा भेदक अन् आक्रमक जाहीरनामा तयार

### काँग्रेसने ५० वर्ष सत्ता उपभोगूनही काय केले नाही याचा करणार पर्दाफाश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. १ मुंबई :** राज्यात दोन दिवसानंतर विधानसभा निवडणुकांचा धुराळा उडणार त्याआधी संपूर्ण महाराष्ट्रात राजकीय वातावरण तापण्यास सुरूवात झाली आहे. या सर्व तापलेल्या वातावरणातच भाजपचा विधानसभेसाठीचा भेदक अन् आक्रमक जाहीरनामा समोर आला आहे. तर, दुसरीकडे जिंकण्यासाठी जन्म आपुला असा नारा देत केंद्रीय गृहमंत्री अमित शाहंनी सर्वांना कामला लागण्याच्या सूचना केल्या आहेत. याबाबत एबीपी माझानं वृत्त दिले आहे.



जाहीरनाम्यात भाजप काय करणार? याची माहिती देण्यात आली आहे. याशिवाय काँग्रेसने ५० वर्ष सत्ता उपभोगूनही काय केले नाही याचा पर्दाफाश या जाहीरनाम्यात करण्यात आला आहे.. याशिवाय प्रत्येक जिल्ह्यातील काँग्रेसने घोषणा करूनही रखडलेल्या जिल्ह्यातील पाच प्रकल्पांची माहिती मागवण्यात आली असून, ही माहिती जमा करण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांची फौज कामाल लावण्यात आली आहे.

याशिवाय छोट्या जातींच्या प्रलंबित मागण्यांनाही भाजपच्या जाहीरनाम्यात स्थान देण्याबरोबरच आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, महिला बचतगट, कोतवाल, तलाठी, ग्रामसेवक अशा घटकांनाही विशेष स्थान देण्यात आले आहे. एकूणच भाजपच्या प्रकाशित होणाऱ्या या जाहीरनाम्यात काँग्रेसची रेघ कशी छोटी आहे आणि घोषणा कशा मोठ्या आहेत हेच दाखवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत असल्याचे समोर येत आहे.

**भाजपच्या जाहीर नाम्यात नेमकं काय?**

एबीपी माझाने दिलेल्या वृत्तानुसार, भाजपच्या विधानसभेच्या जाहीरनामा हा यापूर्वीच्या जाहीरनाम्यापेक्षा भेदक आणि आक्रमक स्वरूपाचा बनवण्यात आला आहे. यात काँग्रेसकडे ५० वर्षांचा हिशेब मागण्यात आला आहे. तसेच जनतेसाठी काय करणार हे सांगण्याबरोबर काँग्रेसने काय केलं नाही हेदेखील जाहीरनाम्यात मांडण्यात आले आहे.



## अयोध्येतील दीपोत्सवाची गिनीज बुकमध्ये नोंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. १अयोध्या**

अयोध्येत राम मंदिराच्या उद्घाटनानंतर पहिली दिवाळी साजरी होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अयोध्येची दिवाळी जगभर प्रसिद्ध असून पुन्हा एकदा ही दिवाळी चर्चेत आली आहे. बुधवारी (३० ऑक्टोबर) अयोध्येत दीपोत्सव सोहळ्यादरम्यान उत्तर प्रदेशने दोन नवीन गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड बनवले.

एकाच वेळी सर्वाधिक लोक दिवे लावतात आणि तेलाच्या दिव्यांच्या सर्वात मोठ्या प्रदर्शनासाठी हे रेकॉर्ड केले आहेत. उत्तर प्रदेश सरकारच्या पर्यटन विभाग आणि अयोध्या जिल्हा प्रशासनाने २५,१२,५८५ लाख दिवे लावून हा विक्रम केला आहे. कार्यक्रमादरम्यान उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गिनीजच्या अधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र स्विकारले. आठव्या दीपोत्सवानिमित्त सरयू नदीच्या काठावर २५ लाखांहून अधिक मातीचे दिवे प्रज्वलित करून सर्वाधिक दिवे लावण्याचा



### घाट आणि भजन संध्या स्थळावर २५ लाख १२ हजार ५८५ दिवे प्रज्वलित

विश्वविक्रम नोंदवला. स्थानिक कारागिरांना दिव्यांची ऑर्डर देण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी समारंभाचे नेतृत्व केले आणि त्यांच्या मंत्रिमंडळ सदस्यांसह पहिले काही दिवे प्रज्वलित करून दीपोत्सवाचे उद्घाटन केले. यावेळी उत्तर प्रदेशचे पर्यटन मंत्री जयवीर सिंह देखील उपस्थित होते. या वर्षी २२ जानेवारीला राम लला मंदिराच्या अभिषेकानंतर हा पहिला दीपोत्सव होता.

यानिमित्ताने संपूर्ण शहर सजवण्यात आले असून प्रभू रामाला समर्पित संगीतमय कार्यक्रम होते. केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत आणि उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांच्यासह अनेक मंत्री आणि मान्यवरांनी राम मंदिराला भेट दिली.

'दीपोत्सव-२०२४'च्या शुभ मुहूर्तावर 'राममय' श्री अयोध्या धामने पुन्हा २५ लाखाहून अधिक दिवे लावून सनातन संस्कृतीचा उत्सव साजरा केला आहे आणि सर्वाधिक दिवे लावण्याचा जागतिक विक्रम केला आहे.

## पाकिस्तानातही पीएम मोदींचा जयजयकार...

### पाकिस्तानी व्यक्तीचा व्हिडिओ ऑनलाइन वेधून घेत आहे लक्ष

**दि.१ इस्लामाबाद-** या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर पीएम मोदी सलग तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान बनले. त्यांचे नाव केवळ भारतातच नाही तर जगभर चर्चेत आहे. शेजारील देशातील लोकही पंतप्रधान मोदींचा जयजयकार करत आहेत. ज्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ण-ए मध्ये राहणाऱ्या एका पाकिस्तानी व्यक्तीचा हा व्हिडिओ ऑनलाइन लक्ष वेधून घेत आहे, अनेक वापरकर्ते भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरील प्रेमाने प्रभावित झाले आहेत. भारतीय कंपनीत काम करण्याचा व्यापक अनुभव असलेला हा माणूस पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाची प्रशंसा करतो, त्यांना सर्वोत्तम पंतप्रधान म्हणतो आणि भारताच्या प्रगतीचा उल्लेख करतो. व्हिडिओमध्ये ते म्हणतात की मोदींच्या नेतृत्वाखाली भारताचा विकास दीर्घकालीन दृष्टीकोन प्रतिबिंबित करतो. तो माणूस सुचवतो की मोदींचे नेतृत्व अशा दूरदृष्टी आणि विकासाला चालना देते आणि मोदी



भारताच्या भविष्यासाठी जो दृष्टीकोन ठेवत आहेत त्याचे कौतुक करण्यासाठी इतरांना प्रोत्साहित करते. पाकिस्तानी व्यक्तीने यूएईमध्ये भारतीय व्यवसायांच्या मजबूत उपस्थितीवर देखील भाष्य केले. भारतीय मालकीच्या सुपरमार्केट, सोन्याच्या बाजारपेठा आणि इतर उद्योगांच्या यशाकडे ते संपूर्ण प्रदेशात वाढणारा भारतीय प्रभाव दर्शवितात.हिंदू आणि मुस्लिम समुदायांमधील संतुलित सहअस्तित्वाचे प्रतीक म्हणून त्यांनी ण-ए मधील धार्मिक सौहार्दावर भाष्य केले, मोदींच्या राजवटीत भारतातही एक सुसंवाद दिसून येईल. यासह ते म्हणतात की, भारताच्या आर्थिक स्थिरतेच्या तुलनेत पाकिस्तानमध्ये महागाई आहे, जिथे बटाटे आणि कांद्यासारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या किमती किलोमागे ४००-५०० रुपयांनी वाढल्या आहेत.

## अरेरे! विधानसभा निवडणुकीत एकाच नावाचे कित्येक डमी उमेदवार, राजकारणात काय सुरु?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१ मुंबई** - नाशिकच्या नांदगावात शिंदे गटाचे सुहास कांदे विरुद्ध ठाकरे गटाचे गणेश धात्रक विरुद्ध महायुतीचे बंडखोर अपक्ष समीर भुजबळ आहेत. पण सुहास कांदेविरोधात एका दुसऱ्या सुहास बाबुराव कांदे नावाच्या इसमाने अपक्ष अर्ज भरलाय. ते सुहास बाबुराव कांदे हे मूळ धाराशीवचे आहेत. यानंतर लगेच ठाकरे गटाच्या गणेश धात्रकांविरोधात अजून एका गणेश धात्रक नावाच्या व्यक्तीचाही अर्ज आलाय. त्यामुळे नांदगावात आता दोन सुहास कांदे, दोन गणेश धात्रक उमेदवार असणार आहेत. कांदेंच्या आरोपांनुसार फक्त मतदारांध्ये संभ्रम पसरवण्यासाठी मंत्री छगन भुजबळांनी सदर व्यक्तीला उभं केलंय. समीर भुजबळ काल धाराशीवच्या सुहास कांदेंना घेवून




उमेदवारी भरण्यासाठी पोहोचले. त्यावेळी सुहास कांदेंचे समर्थक कार्यालयाबाहेर जमले होते .डमी सुहास कांदेंनी अर्ज भरल्यानंतर समीर भुजबळ त्यांना घेवून बाहेर पडले, आणि त्यांना आपल्या गाडीत बसवून निघूनही गेले.छगन भुजबळांनी लोकसभेप्रमाणेच विधानसभेला डमी उमेदवारांचा भगरे पॅटर्न सुरु झाल्याचं म्हटलंय. तो भगरे पॅटर्न म्हणजे लोकसभेला दिंडोरीत शरद पवार गटाचे भास्कर गुरुजींविरोधात भाजपच्या भारती पवार उभ्या होत्या. पण इथंच भास्कर बाबू भगरे नावाचे अपक्ष उभे राहिले. पवार गटाच्या भगरेंचं चिन्ह होतं तुतारी वाजवणारा माणूस, आणि दुसऱ्या भास्कर भगरेंना चिन्ह मिळालं तुतारी. शरद पवार गटाचे भगरे हे पेशानं शिक्षक असल्यामुळे त्यांना भगरे सर म्हणून लोक ओळखतात. पण इयत्ता तिसरी शिकलेल्या दुसऱ्या भरगेंच्या विनंतीमुळे निवडणूक आयोगानं त्यांच्या नावापुढे 'सर' हे टोपणनाव देण्याचं मान्य केलं. भास्कर भगरे १ लाख १३ हजार मतांनी विजयी झाले खरे पण तुतारी चिन्हावर लढलेल्या दुसऱ्या भास्कर बाबू भगरेंनीही १ लाख ३ हजार मतं पदरात पाडून घेतली.

## आज घराघरात लखलखणार लाखो दीपमाला

### उटण्याचा सुगंधात दरवळणार दिवाळी

**दि १ विदर्भ प्रजासत्ताक**

**अमरावती -**भारतीय सस्ं कृ तीत दिवाळी सणाला अधिक महत्व आहे. अभ्यंगस्नान व उटण्याच्या सुगंधाने दिवाळी पर्वातील चार दिवस घराघरात सुगंध दरवडणार आहे. आज सोमवार महालक्ष्मी च्या स्वागतासाठी घरोघरी अंगणातील आकर्षक रांगोळी व मातीच्या आसमंत प्रकाशमान होणार आहे. पणतीच्या दिव्यांच्या लखलखाटाने धनत्रयोदशी, नरकचतुदर्शी, बलीप्रतीपदा व भाऊबीज या चार विचारधारेशी दिवाळी हा सण जुळला आहे.

मानव शरीर बनले पंचतत्वापैकी एक आहे. त्यामुळेच दिवाळीत मातीच्या दिव्यांना अधिक महत्व दिल्या जाते. दिवा पंचतत्वापासून आहे. त्यामुळे दिवाळीत मातीच्या दिव्यांना अधिक महत्व दिल्या जाते.दिवाम्हणजे ज्ञान आणि प्रकाशाचे प्रतिक असून शास्त्रानुसार पुण्यकाळात धनसंपत्तीची देवी लक्ष्मी भ्रमणासाठी बाहेर पडली असतांना ज्या घरात कलह, दारिद्र, रोग व आर्थिक चणचण आहे. परंतु घरात मातीचा दिवा असेल त्या घरातलक्ष्मी विराजमान होते अशी आख्यायिका आहे. धनत्रयोदशी पासून घराघरासमोर दिवे. लावण्याची परंपरा आहे. मातीचा दिवा लावल्याने लक्ष्मी प्रसन्न होते. मातीच्या



दिव्याच्या प्रकाशाने वास्तुदोष दूर होतो.तर वातावरणातील नकारात्मक उर्जा नाहीशी होऊन सकारात्मक उर्जा मिळते. विषारी शुक्ष्म काटाणू दिव्याच्या धुराने नष्ट होतात. असे वैज्ञानिक कारण सुध्दा त्यामागे आहे.दिपावली पर्वाच्या चार दिवसात अभ्यंगस्नानाला घराघरात फर महत्व आहे. दैनंदिन जिवनात आपल्या त्वचेवर ऊन, वारा, पाऊस याचा परिणाम होत असतो. प्रत्येक क्षणी त्वचा ही निसर्गाशी जुळवुनश घेत असते.दिवाळीच्या काळातच थंडीला सुरवात होते. निसर्गात चंद्राचा प्रभाव वाढतो. सुर्य दक्षिणात जातो. हवेत शितलता व शरीराच्या आतील उष्णता या दोन्ही घटकामुळे त्वचा फाटते. त्यामुळे तिळाच्या तेलाने अंगचोळून स्नान करणेम्हणजे अभ्यंगस्नान होय. या स्नानाने घरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण होते.

आयुर्वेदशास्त्रानुसार उटण्याला विशेष महत्व आहे.घरगुती स्वरुपातील उटणे म्हणजे हळद, आंबेहळद, दुधाची साय, कचोरा, मंजीरा, आवळा आदीचे मिश्रण करुन उटणे तयार केले जाते. सध्या उटणे दिवाळी पर्वातील अभ्यंगस्नानापुरतेच मर्यादित राहीले आहेत. परंतु वगस्पती औषधी उटणे कायमस्वररुपी वापरल्यास त्वचेचे विकार दूर होतात. त्वचेचे संरक्षण करण्यासाठी उटण्याचा वापर केल्यास साबणाला उत्तम पर्याय म्हणून आजही बरेच लोक आयुर्वेदिक औषधापासून बनविलेले उटणे वापरतात. मातीच्या दिव्या सोबतच मोठमोठ्या इमारतीवर विद्युत रोषनाई केल्या जाते, मात्र त्या भव्य इमारतीत सुध्दा मातीचा त्या भव्य इमारतीत सुध्दा मातीचा दिवा लावल्याशिवाय दिवाळीचा सण साजरा केल्याचे सामाधान लाभत नाही. म्हणूनच दिवाळीत मातीचा दिवा, कापसाची वात व तेल याच्या तेजोमय प्रकाशाला विशेष महत्व आहे.




## संपादकीय ......

# निवडणुकीचा माहोल ‘नांदा सौख्य भरे’पासून ‘भांडा सौख्य भरे’पर्यंत...

*महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा माहोल सध्या ‘नांदा सौख्य भरे’च्या टप्प्यावर आहे. उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर ‘भांडा सौख्य भरे’ सुरू होईल. महायुती व महाविकास आघाडीतील जागावाटप, सगळ्या पक्षांच्या उमेदवारांची घोषणा हे सर्व सुरू असताना राजकीय पक्ष आणि खासकरून काही घराणी ज्या काही ‘तडजोडी’ करीत आहेत, त्या पाहिल्या तर डोके भणाणून जावे. विचारधारा, पक्ष, नेते यावरील निष्ठा खुंटीला अडकवून भद्र-अभद्र पक्षांतरे सुरू आहेत. पक्षांच्या फोडाफोडीमुळे राज्याच्या राजकारणाचा चिखल झाला आहेच. तरीदेखील काही नेते, त्यांची कुटुंबे कुठल्या तरी एका बाजूला आहेत, हे समाधान होते. तेदेखील मतदारांना मिळू न देण्याचा चंग जणू या मंडळींनी बांधला आहे.*

*भाजप व काँग्रेस हे दोन राष्ट्रीय पक्ष, दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी काँग्रेस, राज ठाकरे यांची मनसे तसेच बच्चू कडू, राजू शेट्टी, संभाजीराजे यांची परिवर्तन महाशक्ती आघाडी, ड. प्रकाश आंबेडकरांची वंचित बहुजन आघाडी इतकी गर्दी निवडणुकीत उतरली आहे. शिंदेसेनेला बंडावर लोकप्रियतेचा शिक्का हवा आहे, तर त्यांच्यावरील गद्दारीचा शिक्का उद्धव ठाकरे यांना सिद्ध करायचा आहे. अशीच स्थिती दोन्ही राष्ट्रवादींची आहे. महायुती व महाविकास आघाडी महाराष्ट्राचे कधीच हित साधू शकत नाही हा तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या आघाडीचा प्रचाराचा मुद्दा आहे. अर्थातच विधानसभेत जाण्याची स्वप्ने पडणाऱ्यांना उमेदवारीचे असंख्य पर्याय उपलब्ध आहेत. त्यासाठी इकडून तिकडे उड्या मात्र नक्कीच माराव्या लागतील. तशा त्या मारताना होणारी पक्षांतरे धक्कादायक मात्र अजिबात नाहीत. ती ठरवून केली जात आहेत. सगळ्यांची सोय पाहून निर्णय होत आहेत.*

*नवी मुंबईतल्या नाईक कुटुंबाला एकापेक्षा अधिक आमदारकी घरात हव्या आहेत. त्यासाठी वडील गणेश नाईकांनी हातात ‘कमळ’ तर मुलगा संदीपने हातात ‘तुतारी’ घेतली आहे. एकाचवेळी ‘कमळ’ फुलेल व ‘तुतारी’ही वाजेल असे स्वप्न पाहिले जात आहे. माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांच्याही घरात दोन पक्ष अवतरले आहेत. स्वत: राणे लोकसभेला विजयी झाले आहेतच. कणकवलीत नितेश राणे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. तथापि, माजी खासदार निलेश राणे यांना भाजपमधून संधी शक्य नसल्याने त्यांनी आता शिंदेसेना जवळ केली आहे. पंकज यांच्या पराभवाचा वचपा माजी खासदार समीर भुजबळ यांना काढायचा आहे. विदर्भातील पुसदचे नाईक घराणेही मागे नाही. मनोहर नाईक यांचे चिरंजीव इंद्रनील सध्या पुसदचे अजित पवार गटाचे आमदार आहेत. गेल्यावेळी त्यांनी चुलत बंधू निलय नाईक यांचा पराभव केला होता.भुजबळांच्या घरातही दोन पक्ष अवतरले आहेत. स्वत: छगन भुजबळ येवल्यातून अजित पवार गटातून लढतील. त्यांचे चिरंजीव, शेजारच्या नांदगावचे माजी आमदार पंकज भुजबळ नुकतेच राज्यपाल कोट्यातून विधान परिषदेचे आमदार बनले. तिथले आमदार सुहास कांदे शिंदेसेनेत आहेत आणि भुजबळ-कांदे यांच्यातील वाद जुना आहे. पंकज यांच्या पराभवाचा वचपा माजी खासदार समीर भुजबळ यांना काढायचा आहे. विदर्भातील पुसदचे नाईक घराणेही मागे नाही. मनोहर नाईक यांचे चिरंजीव इंद्रनील सध्या पुसदचे अजित पवार गटाचे आमदार आहेत. गेल्यावेळी त्यांनी चुलत बंधू निलय नाईक यांचा पराभव केला होता. आता ही भाऊबंदकी थेट सख्ख्या नात्यात झिरपली आहे. इंद्रनील यांच्याविरोधात बंधू ययाती यांनी दंड थोपटले आहेत. मुलांच्या भांडणात मनोहरराव व्यथित आहेत.अमरावती मधील मेळघाट मधील प्रहार पक्षाचे विद्यमान आमदार राजकुमार पटेल यांनी निवडणुकीच्या आठ दिवस आधी पक्ष सोडले नंतर शिंदे गटात जाण्याचं ठरविले मात्र तिथे आपली डाळ शिजत नसल्याचे लक्षात येताच लागेलच घर वापसी केली.*

*थोरांच्या घराघरांमध्ये एकत्र नांदू पाहणारे विविध पक्ष युती व आघाडीत एकमेकांना उमेदवारही पुरवत आहेत. पूर्व टोकावरच्या अर्जुनी मोरगावमध्ये भारतीय जनता पक्षाने माजी मंत्री राजकुमार बडोले यांना अजित पवारांच्या छावणीत धाडले आहे. त्यासाठी विद्यमान आमदारांचे तिकीट कापण्याचा त्याग अजित पवारांनी केला आहे. पती संजय खोडके अजित पवारांचे खास आणि आपण मात्र काँग्रेसच्या आमदार अशा एकाच घरात दोन स्वयंपाक घरांचा प्रयोग अमरावतीच्या सुलभा खोडके यांना नको असावा. म्हणून त्यांनी काँग्रेसचा त्याग केला. इगतपुरीचे हिरामण खोसकर तसे मूळचे राष्ट्रवादीचे. दिग्गज नेते माणिकराव गावितांच्या कन्या निर्मला या गेल्यावेळी काँग्रेस सोडून शिवसेनेत गेल्यामुळे ऐनवेळी राष्ट्रवादीने खोसकरांना काँग्रेसमध्ये पाठवले. ते आमदार झाले. आता ते स्वगृही परतले आहेत. आता निर्मला गावित कधी परत जुन्या घरट्यात येतात ते पाहायचे. ही सगळी बजबजपुरी माजलीय ती केवळ आणि केवळ मतदारांना राजकीय पक्ष गृहीत धरीत असल्यामुळेच. अनुभव असा आहे की, मतदारांना हे अजिबात आवडत नाही. राजकीय पक्ष व घराण्यांकडून सुरू असलेली ही मनमानी मतदार सहन करतात का, हे निकालात स्पष्ट होईलच.*

# पेरणीच्या वेळेनुसार गव्हाच्या कोणत्या जातींची निवड कराल?

**दि.१विदर्भ प्रजासत्ताक**

रब्बी हंगामाला सुरवात झाली असून आता गव्हाच्या पेरणीला सुरवात होईल. पेरणीच्या वेळी कोणत्या जातीच्या गव्हाची निवड करावी, हे या लेखातून पाहुयात..




गहू पिकाला थंड परंतु कोरडे आणि स्वच्छ सूर्यप्रकाशित हवामान चांगले मानवते. पिकाच्या अनुकूल वाढीसाठी ७ ते २१ अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. मात्र दाणे भरण्याच्या वेळी २५ अंश सेल्सिअस तापमान असल्यास दाण्यांची वाढ चांगली होऊन दाण्याचे वजन वाढते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

या पिकास आवश्यक असलेले तापमान पीक वाढीच्या योग्य अवस्थेत मिळण्यासाठी पेरणीची वेळ अतिशय महत्त्वाची ठरते. त्यानुसार बागायती वेळेवर पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात करावी. बागायती उशिरा पेरणी १६ नोव्हेंबर ते १५ डिसेंबर दरम्यान करावी. बागायती गव्हाची पेरणी ५ नोव्हेंबरनंतर उशिराने केल्यास प्रत्येक उशिराच्या पंधरवड्यात गव्हाचे उत्पादन हेक्टरी अडीच क्विंटल घटते.

जिराईत गव्हाच्या पेरणीसाठी

गहू पिकाच्या फुलोरा आणि दाणे भरण्याच्या अवस्थेत योग्य तापमान आणि जमिनीत पुरेसा ओलावा असणे गरजेचे असते. त्यासाठी जिराईत गव्हाची पेरणी ऑक्टोबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात करावी. उशिरापर्यंत पडणारा पाऊस लक्षात घेता जिराईत गव्हाची पेरणी एक/दोन आठवड्याने उशिरा करण्यास हरकत नाही. पेरणीच्या वेळेनुसार शिफारस केलेल्या जातींचा तसेच हेक्टरी बियाणांचा वापर करावा. जिराईत पेरणीसाठी छखऊ्थ-१५ (पंचवटी) व शरद या जातींची शिफारस केलेली आहे. जिराईत पेरणीसाठी हेक्टरी ८० ते १०० किलो बियाणे वापरावे.

बागायत वेळेवर आणि उशिरा पेरणीसाठी...


तसेच बागायत वेळेवर पेरणीसाठी च-उड-६२२२, छख-थ-३०१ (त्र्यंबक), छख-थ-९१७ (तपोवन) व छख-थ-२९५ (गोदावरी) या जातींची शिफारस करण्यात आलेली आहे. बागायत वेळेवर पेरणीसाठी हेक्टरी १०० ते १२५ किलो बियाणे वापरावे. बागायत उशिरा पेरणीसाठी -घ-थ-४६२७ व छख-थ-३४ या जातींची शिफारस केलेली आहे.

उशिरा पेरणीसाठी हेक्टरी १२५ ते १५० किलो बियाणे वापरावे. वेळेवर तसेच उशिरा पेरणीसाठी फुले समाधान या वाणाची शिफारस आहे. पाण्याची उपलब्धता कमी प्रमाणात असल्यास छख-थ-१४१५ (नेत्रावती) व कऊ-२१८७ (पुसा बहार) या वाणांची शिफारस करण्यात आलेली आहे.

**- डॉ. कल्याण देवळाणकर, सेवानिवृत्त कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ**

# आता ग्रामपंचायत स्तरावर हवामान अंदाज, दर तासाला अपडेट मिळणार

*__दि.१ विदर्भ प्रजासत्ताक-__ एकीकडे नैसर्गिक संकटे, पाऊस, बदलते हवामान यामुळे शेतकऱ्यांना शेती करणे अवघड झाले आहे. मात्र आता केंद्र शासनाने थेट ग्रामपंचायत स्तरावर हवामान अंदाज दिला जाईल, अशी यंत्रणा उभी करण्याचे ठरविले आहे. यापूर्वीच इ स्वराज या ग्रामपंचायत स्तरावर वापरल्या जाणाऱ्या अँपवर हि माहिती मिळत होती, मात्र आता अधिक अचूक, तत्पर सेवा ग्राम स्तरावरील शेतकऱ्यांना मिळण्यास मदत होणार आहे. गेल्या काही वर्षात नैसर्गिक संकटांनी शेतकऱ्यांना हतबल केले आहे. बदलत्या हवामान अंदाजामुळे शेतकऱ्यांना नेमके पीक व्यवस्थापन करणे अवघड होऊन बसते. याच पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अचूक हवामान अंदाज मिळावा यासाठी पंचायती राज मंत्रालय, भारतीय हवामान विभाग आणि पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांना पेरणी, सिंचन, कापणी इत्यादिंसह इतर शेती कामांचे नियोजन करण्यास मदत होईल. या उपक्रमाचा उद्देश असा आहे की, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे सक्षमीकरण तसेच महापूर, ढगफुटी, गारपीट आदी नैसर्गिक आपत्तीची तयारी वाढवण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आला आहे. हा उपक्रम ई-ग्रामस्वराज, मेरी पंचायत प आणि ग्राम मंचद्वारे हवामान अंदाज दिला जाईल. गेल्या १० वर्षांत अवकाश तंत्रज्ञानाच्या मदतीने हवामान अंदाज अचूकता ४० टक्क्यांनी वाढली असल्याचे पृथ्वी विज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी अधोरेखित केले. याच अनुषंगाने या उपक्रमाद्वारे पाच दिवसांचे हवामान अंदाज, दर तासाला अपडेट केले जातील.*



***अंदाज कोठे उपलब्ध असतील?-***

*ई-ग्रामस्वराज आणि ग्राम मंच पोर्टल आणि मेरी पंचायत पवर तासाभराचे अंदाज उपलब्ध असतील. ई-ग्रामस्वराज यावर आधीच अंदाज मिळत असतात. यात सध्याचे तापमान, वाऱ्याचा वेग, ढगांचे आच्छादन (टक्केवारीत), पाऊस आणि सापेक्ष आर्द्रता ग्रामपंचायतींच्या पातळीवर डेटा पाहता येणार आहे. किमान आणि कमाल तापमानाचा पाच दिवसांचा अंदाज, पाऊस, ढगांचे आवरण, वाऱ्याची दिशा आणि वाऱ्याचा वेग आणि एकूण हवामानाचा अंदाज दिला जाणार आहे.*







दैनिक विदर्भ प्रजासत्ताक

यह समाचार पत्र मालक शुभांगी अरुण जोशी, प्रकाशक अरुण जोशी इन्होने मुद्रक हेमंत रामकिशोर जैस्वाल इनके मुद्रणालय श्रद्धा प्रिंटर्स, लक्ष्मी नगर अमरावती, जिल्हा अमरावती महाराष्ट्र यहां छपवाकर कार्यालय श्याम नगर, काँग्रेस नगर अमरावती - ४४४६०४ जि. अमरावती महाराष्ट्र से प्रकाशित किया - संपादक शुभांगी अरुण जोशी

Dainik Vidarbha Prajasattk evening news paper owned by Shubhangi Arun Joshi and published by Arun Joshi and printed by Hemant Ramkishor Jaiswal , Shraddha Printers, Lakshmi Nagar , Amravati , district Amravati and published at Shyam Nagar office , Congress Nagar Road Amravati-444606 . Editor : Shubhangi Arun Joshi . Contact : 9607673850 , E-mail : prajasattaknews24@gmail.com




# नवा दिवस, नवा झेंडा



कार्यकर्ते मंडळींना नम्र विनंती आहे की, दररोज प्रचाराला सुरुवात करण्यापूर्वी आपले साहेब त्याच पक्षात आहेत का, याचे अपडेट घेत जा. आपण प्रचार करण्यापूर्वी नेमका कोणत्या पक्षाचा प्रचार करणार आहोत, याचे अपडेट दर तासाला घेतले पाहिजेत. कारण, साहेब कोणत्या तासाला कोणत्या पक्षामध्ये असतील ते सांगता येत नाही. बहुतेक या निवडणुकीमध्ये बरेच लोक सकाळी एका पक्षात, दुपारी एका पक्षात आणि झोपताना तिसर्याच पक्षात असतील, अशी शक्यता वाटत आहे.

महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यामध्ये प्रत्येकी तीन पक्ष आहेत आणि शिवाय तिसरी आघाडी यांचे दरवाजे सगळ्यांसाठी खुले आहेत. नुकतीच एक चौथी आघाडीपण निर्माण झालेली आहे. ज्याला कोणाला अशा कुठल्याही टीममध्ये जायचे नाही त्यांच्यासाठी अपक्ष उभे राहण्याचा पर्यायपण खुला आहे. सकाळी 'शिवबंधन' बांधलेला नेता संध्याकाळी 'धनुष्यबाण' हातात घेतो आणि दुसर्या दिवशी 'धनुष्यबाण' खाली ठेवून 'मशाल' किंवा 'तुतारी' हातात घेऊन मिरवायला लागतो. हा सगळा थक्क करणारा प्रकार जनता पाहत आहे. बरे, शिवाय हे सगळे जे काही चाललेले आहे ते तुमची आमची सेवा करण्यासाठी सुरू आहे. कुणाचाही यात व्यक्तिगत स्वार्थ नाही किंवा पिढ्यान् पिढ्या पुरेल इतके कमवण्याची इच्छा नाही. त्यांची एक आणि एकच इच्छा आहे ती म्हणजे जनतेची सेवा करणे. जनतेच्या सेवेसाठी आसुसलेले इतके नेते ज्या देशामध्ये आहेत तो देश लवकरच सुजलाम् सुफलाम् होऊन जगामधील एक क्रमांकाची महासत्ता होणार याबद्दल काहीही शंका नाही.

प्रत्येक पक्षामध्ये गेली पाच वर्षे किमान अर्धा डझन नेते उमेदवारीच्या म्हणजेच आमदारकीच्या तयारीला लागले होते. प्रत्यक्ष निवडणुका जवळ आल्यानंतर तो पक्ष फक्त एकालाच तिकीट देऊ शकणार आहे. ज्याला तिकीट मिळाले नाही तो असंतुष्ट लगेच दुसर्या पक्षाकडून तिकीट मिळते का, याची चाचपणी करतो. त्या पक्षातून मिळत नाही असे लक्षात येताच तिसर्या, चौथ्या, पाचव्या किंवा सहाव्या पक्षातून तिकीट मिळते का, याची चाचपणी करतो आणि यापैकी काहीही शक्य झाले नाही, तर थेट बंडाचा झेंडा उभारून अपक्ष म्हणून उभा राहतो.

तत्त्वाला मुरड घालावी लागली तरी चालेल, पक्षनिष्ठा तोडली तरी चालेल; पण लोकांची सेवा करणारच हा दृढ निश्चय घेऊन असंख्य नेते निवडणुकीच्या आखाड्यामध्ये उतरत आहेत. सामान्य जनतेला वाटेल की, हे सर्व काही अचानक घडत आहे, तर तसे अजिबात नाही, हे आधी समजून घ्या. या सर्व लोकांची निवडणूक लढवण्याची तयारी पाच वर्षांपासून आहे आणि ऐन वेळेला पक्ष तिकीट नाही म्हणत असेल, तर तयारीत असलेला उमेदवार किती बरे नाराज होते असेल नाही? मग, तुमची सेवा करायची हा निश्चय करून तो या पक्षातून त्या पक्षात, त्या पक्षातून तिसर्याच पक्षात आणि काहीच नाही, तर अपक्ष म्हणून उभा राहतो. त्यामुळे कार्यकर्त्यांना आमची विनंती आहे की, सकाळी प्रचाराला लागण्यापूर्वी साहेब नेमके कोणत्या पक्षात आहेत, याची माहिती करून घ्या आणि मगच प्रचाराला लागा. अन्यथा आपण वेगळेच चिन्ह घेऊन मिरवत आहोत आणि साहेब वेगळेच चिन्ह आणि तिकीट घेऊन आले आहेत, असे झाले, तर सगळा गोंधळ उडेल.

















## दिवाळीत कंदील उंच टांगण्यामागे असलेले कारण वाचून थक्क व्हाल!



विदर्भ प्रजासत्ताक १

दिवाळीत आपण रोषणाई करताना जराही हात आखडता घेत नाही. कारण, हा सणच दीपोत्सव म्हणून ओळखला जातो. मात्र, ही रोषणाई करताना काही शास्त्रीय संकेत, लोकसमजूती प्रचलित आहेत. त्यांचा मागोवा घेऊया.

देवापुढे लावायच्या दिव्यात तेल किंवा तूप याव्यतिरिक्त अन्य कोणतेही ज्वलनद्रव वापरू नये, असे अग्नीपुराणातील आदिकल्प पुराणात सांगितले आहे. देवघरात जी समई असते, ती देवतास्वरूप आहे, म्हणून नित्यनेमाने पूजारंभी व दीपोत्सवाच्या वेळी तिची पूजा करण्याचा कुळाचार आहे.

दीपावली हा दिव्यांनी रोषणाई करण्याचा सण. त्यात आता लायटींगची भर पडली आहे. तरीदेखील पणती, दिवे, आकाशकंदील यांचे स्थान टिकून आहे. कारण ते दिवाळीची शोभा नव्हे तर उत्सवमूर्ती आहेत. दिवाळीत कितीही रोषणाई केली तरी कंदील हवाच. तोही स्वहस्ते बनवलेला असेल तर आनंदी आनंदच! तो खिडकीत, दारात किंवा अंगणात उंचावर लावला जातो. पूर्वी विद्युत सुविधा नसताना हा उंचावर टांगलेला कंदीलही रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या वाटसरूंसाठी मनुष्यवस्तीची निषाणी असे. पुढे विद्युतनिर्मिती झाली आणि कंदीलाची ओळक दिवाळीपुरती मर्यादित राहिली. तरीदेखील दिवाळीत त्याचे महत्त्व अद्वितीय आहेच!

आपला कंदील उंचावर लावावा आणि तो सर्वांनी पहावा, हा आपला उद्देश असतोच. परंतु, अशीही एक लोकसमजूत आहे, की, दीपावलीच्या वेळी आकाशात झेप घेऊन उंच लटकणारा आकाशकंदील पितरांना प्रकाश देतो. तसेही धनत्रयोदशीच्या सायंकाळी दक्षिण दिशेला आपण दीवा लावतो. तोदेखील पितरांच्या सद्गतीचा मार्ग उजळून निघावा म्हणूनच! त्यामुळे ही समजूत त्यालाच पुरक असू शकते!

या व्यतिरिक्त दिवाळीत दिव्यांना विशेष महत्त्व असते. दिवा आपण प्रत्येक शुभकार्यात वापरतोच! लग्नकार्यात रोवळीत एक लामणदिवा ठेवतात. त्याला शकुनदिवा म्हणतात. देवपूजेच्या वेळी किंवा कोणत्याही मांगलिक कार्यात साक्षी म्हणून एक दिवा अखंडपणे तेवत ठेवलेला असतो. जसा की आपण नवरात्रीत ठेवतो. त्याला नंदादीप म्हणतात. दिवाळीत घर, अंगण, उंबरठा नव्हे तर सबंध परिसर छोट्या, मोठ्या दिव्यांनी लखाकून निघतो. अशा दीपदर्शनाने जीवनात मांगल्य निर्माण होऊन मन उजळून जाते. व तेच मांगल्या पुढील वर्षभर मनात तेवत राहते...!




# शाल





**सौ. गायत्री मुळे**
नागपूर :- ३२
फोन :- ९७६७००८९७७

ऑफिसमधून बाहेर पडताच थंड हवा अंगाला झोंबली. तिने ओढणी अंगभर लपेटून घेतली. कानाला थंड हवा लागत होती. पण कान झाकले तर हात उघडे राहिले असते. रिक्षावाल्याला आवाज देऊ का आजच्या दिवस? नको, पैसे उगा खर्च होतील. त्यात दोन दिवसांची भाजी होऊ शकते. अजून दहा मिनिटे वाट बघितली की बस येईल हे तिला माहिती होतं. ती बसस्टॉपकडे चालत जात होती. ऑफिसमध्ये नुकतीच लागलेली पोरसवदा मुलगी तिच्या टू-व्हीलर वर बसली. आणि जाताजाता तिला हात दाखवून पुढे निघून गेली. तिच्या आणि आपल्या वयात किती फरक असेल? जास्ती नाही. पण ती रसरशीत दिसते आणि आपण सतत ओरबाडलेल्या. ती गेली त्या दिशेला बघून चालताना तिच्या पायातली चप्पल दुमडली. पायाचा अंगठा मुरगळल्या सारखा झाला. कळ आली तिच्या पूर्ण पावलात. बसस्टॉप जवळ रांगेत उभं राहिल्यावर तिकिटाचे पैसे वर काढून ठेवावे असा तिच्या मनात विचार आला. हाताला सासूचं ीिळीलीळींळेप लागलं. बापरे. आज औषधं नाही नेलीत तर धडगत नव्हती. पण आता दहाच मिनिटात येणारी बस सुटली तर तिला ते सुद्धा परवडणारं नव्हतं. घराजवळच्या दुकानातून घेता येतील असा तिने विचार केला. तिकिटाचे पैसे वर काढून तिने पर्स बंद केली. टेकून बसावं असं वाटत होतं. पण जागा नव्हती. पाय दुखत होता. नखाच्या समोरच्या टोकावर रक्त गोठल्या सारखं झालं होतं.

ओढणी अजूनच घट्ट लपेटून ती बसची वाट बघत होती. जास्त ओढून लपेटल्याने ती ओढणी एका ठिकाणी विरल्यासारखी झाली. आईची शाल खरं तर नुसती पडून असते पण मागितल्यावर त्या देतील की नाही ही तिला खातरी नव्हती. अजून दहा पंधरा दिवस आहेत थंडीचे तिने मनाशी विचार केला. निभतील कसेही. पुढच्यावर्षी घेऊ नवी शाल.

बस येतांना दिसली आणि स्टॉपवरचे सगळे धावत पुढे जायला निघाले. धक्काबुक्की, रेटारेटी झाली. आधीच दुखावलेला अंगठा आणि त्यात कोणीतरी तिच्या पायावर कच्चकन पाय दिला. कळवळली ती. डोळ्यात पाणी आलं. समोरच्याला ढकलू सुद्धा नव्हती शकत इतकी दाराशी एकदम गर्दी झाली होती. चिणून काढल्यासारखी ती त्या गर्दीत ठेचल्या गेली आणि आपोआप समोर ढकलल्या गेली. आत बसायला जागा नव्हतीच पण निदान बस मध्ये चढायला मिळालं ह्यातच तिला हुश्य वाटलं.

दिवसभर ऑफिसमध्ये काम पुरायची. घरातून निघेपर्यंत तिचा हात सतत कामात असायचा. घरी गेलं की तेच. सासूबाईंना कामं होत नव्हती असं नव्हतं पण करायची ईच्छाच नसायची. नुसत्या एका खुर्चीत दिवसभर बसून राहायच्या. घरात पाय ठेवल्याबरोबर तक्रारींचा पेटारा उघडायच्या. दुखणं आणि आजारपण हा विषय तर अगदी रोजचा झाला होता.

बसमध्ये गर्दी असल्याने थंडी जाणवत नव्हती. पण जीव मात्र घाबरत होता. मागून पुढून माणसांचे किळसवाणे स्पर्श होत होते. काही जाणून बुझुन केलेले, काही चुकून झालेले तर काही मुद्दाम रेंगाळणारे. हे इतकं सवईचं झालेलं होतं की मन आता मरून गेलं होतं. शरीर सुद्धा. पण ह्यातलाच एखादा स्पर्श रात्री अंगावर गोंदल्यासारखा ठळक व्हायचा. आणि मग हळूहळू उधाण यायचं नको त्या अविचारी लाटांना. कठीण व्हायची ती रात्र. तळमळत जायची.

तिचा स्टॉप आला उतरण्यासाठी सुद्धा तितकीच धक्काबुक्की. उबग आला तिला. काय करायचं आहे इतकी घाई करून? जा तू पुढे. तुझ्या घरात फक्त तुझी विधवा सासू असती वाट पाहणारी तर तुला पण इतकी घाई नसती झाली. समोरच्या बाई कडे बघून तिच्या मनात विचार आला.

आपोआप ती खाली उतरली. अंगठ्याची ठणक परत एकदा जाणवली. दोन्ही पायावर स्वतः ला सांभाळत ती काही वेळ उभी राहिली दीर्घ श्वास घेतला. बस मध्ये गुदमरलेला जीव बाहेरच्या हवेत थोडा सुखावला. त्या ओढाताणीत ओढणी जास्त फाटली. ती ओढणी अंगावरून काढून तिचे बारीक बारीक तुकडे करून हवेत फेकून द्यावे वाटले तिला. सगळं च झुगारून द्यावं. ही नोकरी, ही धक्काबुक्की, घरातली वाट पाहणारी सासू, हे नकळत आलेलं एकटेपण, आणि वैधव्य सुद्धा. बस मध्ये तिच्या मागे उभा राहून तिला खेटून उभा असलेला माणूस तिच्याकडे बघून विचित्र पणे हसत पुढे जातो आहे असं तिला वाटलं. असू दे फाटकी तर फाटकी ओढणी. निदान शरीर झाकायला मदत करते आहे.

विचारांच्या नादात ती घराजवळ पोचली आणि तिला लक्षात आलं की तिने औषध घेतले नाहीत. ती चरफडत परत मागे फिरली. आणि मेडिकल हिेंमध्ये गेली. झीशीलीळींळेप समोर ठेवून तिने विचारलं की सगळ्या औषधांचे किती होतील? तिला खरं तर माहिती होतं कारण दर महिन्यात तीच आणत होती. आणि अजून पगार व्हायला आठवडा बाकी होता. एक तारखेला महिन्याचे औषध आणल्या नंतर ते आठ दिवस आधी कसे संपले असतील? घरात एकट्या असतात तेंव्हा जास्ती तर डोस घेत नसतील न? शक्यच नाही. स्वतः च्या जीवाला वाजवीपेक्षा जास्त जपतात त्या. मग ? औषध कुठे गेले? मुद्दाम संपले सांगितलं असेल का? नक्कीच. ही एकच शक्यता आहे. तिने मेडिकल वाल्याला फक्त थायरॉईड च्या गोळ्यांची बाटली मागितली. ही निदान तीन महिने जाते. बाकी औषधं पगार झाला की आणावे लागतील.

तितकी बाटली घेतली तरी उरलेल्या आठ दिवसांचं बजेट कोलमडलेलं होतं.

कॉर्नरला असलेल्या पाणीपुरीवाल्या गाडीजवळून जातांना तिने रोजसारखा दीर्घ श्वास घेतला. तो आंबट गोड वास भरभरून घेतांना तिला रोज नवऱ्याची आठवण यायची. ती आणि तो रोज रात्री जेवण झालं की पायी पायी चालायला जायचे. आणि येतांना एक प्लेट पाणीपुरी घेऊन दोघं मिळून खायचे. आता ही तिला ते अगदीच अशक्य होतं असं नाही. पण नको वाटायचं एकटीने पाणीपुरी खायला. तश्याही मनःस्थितीत तिला सासूची आठवण यायची की त्या एकट्या घरात बसलेल्या आहेत. नवरा गेल्यानंतर तिने एकदाच त्यांना म्हटलं होतं की आपण पाणीपुरी खाऊ. त्यावर त्यांनी नुसतं आकांडतांडव केलं होतं की माझा मुलगा जिवानिशी गेला आणि तुला जिभेचे चोचले कसे काय सुचतात? त्यामुळे नवर् सोबत खाल्लेली पाणीपुरीची आठवण अजूनही तशीच होती.

सासू अशी का वागत असेल ह्याचा ती नेहमी विचार करायची. खूप प्रयत्न केला तिने त्यांना समजून घेण्याचा. त्यांचा एकुलता एक मुलगा गेला, तडकाफडकी गेला, त्यांचं वय झालेलं आहे, त्यांना असुरक्षित वाटतं असेल. ... पण सासूने मात्र तिला समजून घेण्याचा जराही कधी प्रयत्न केला नव्हता. तिचं तरुण वय, अचानक आलेलं वैधव्य, माहेरचा आधार नाही, दिवसभर करावी लागणारी नोकरी आणि म्हाताऱ्या सासूची जवाबदारी. ह्या गोष्टींचा त्यांनी पण विचार करायला हवा होता. पण त्या मात्र तिला दिवसेंदिवस फक्त खोचकं बोलत होत्या. जगण्याची कुठलीही उमेद तिला नव्हती. आपण का जगतो किंवा का ह्या म्हाताऱ्या बाई साठी रोज त्याच घरात येऊन का जीवाची दैना करून घेतो आहे हे तिला समजत नव्हतं.

पण तरीही ती रोज घरात परत जात होती. सासूबाईंच्या टोमण्या कडे दुर्लक्ष करत होती. रोज रात्री जागत होती. आता रडायला येत नव्हतं. पण सगळ्या जगावर चीड यायची. संताप संताप व्हायचा. त्यात झोप लागायला लागली की सासूबाई मोठ्याने टिव्ही लावायच्या. आणि सोफ्यावर आडव्या व्हायच्या. त्यांना झोप लागायची केंव्हातरी पण हिची झोप मात्र पार उडून गेलेली असायची. पांघरूणातून उठायची इच्छा नसायची. अतिशय थंडी होती.

घर अगदी कोपऱ्यावर होतं. स्ट्रीटलाईटचा उजेड अंगणात पडला होता. दार बंद होतं. घरातही अंधार होता. तिने दार वाजवले. पण ते उघडेच आहे हे तिला लक्षात आल्यावर दार लोटून ती अंधारात चाचपडत आत आली. आवाज दिला सासूला. पण काहीच हालचाल नव्हती. अंदाजाने तिने लाईट लावला.

सासूबाई सकाळच्या च अवतारात बसलेल्या होत्या. त्यांनी अंघोळ केली नव्हती. जेवण करून खरकटी ताटली तिथेच बाजूला ठेवून त्यातच हात धुतले होते. तिचं टाळकं एकदम सरकलं.

संतापून त्यांना काहीतरी वर्मी लागेल असं बोलावं वाटलं. पण त्यांनीच आधी सुरू करून दिलं औषधाच्या नावाने. थायरॉईड चया गोळ्यांची डब्बी त्यांच्यासमोर आपटून ती आत गेली. थंडी इतकी होती पण चेहऱ्यावर सपासप पाणी मारलं. तिला किंचित तरतरी आली. चाहा घ्यावा वाटलं. पण दूध संपून गेलं होतं. दोघींचा दोनदा चाहा होईल इतकं दूध ती घेत होती. सकाळचं उरलेलं अन्न तिने गरम केलं. त्यांची ताटली अनलाई आणि दुसऱ्या ताटलीत त्यांना जेवायला वाढलं. त्या जेवत नाही म्हणून तोंड फिरवून बसल्या.

घरात मी एकटी असते, बाकीचे औषध आणले नाही, मरून पडेल दिवसभरात, साधा टिव्ही नाही, मला वेड लागेल अशी आणि अखंड बडबड त्या करत होत्या. तिने चार घास खाल्ले आणि इच्छा मारून गेली. तोंडाला तोंड देऊन मुजोऱ्या कराव्या वाटत होतं पण आज ती सुद्धा इच्छा नव्हती. ती तुटून गेली. सगळ्या जगात एकटं पडल्याची जाणीव तिला झाली.

माझं मुलगा असता तर माझ्यावर ही वेळ आली नसती. तुला निघून जायचं असेल तर तू जा हे सासूचं वाक्य ऐकल्यावर तिला संताप प येता कीव आली. तिला सुटल्या सारखं वाटलं. पण ते तात्पुरतं असणार होतं. कारण जाऊन जाणार कुठे होती ती? अनाथ आश्रमात डोळे उघडले आणि तिथेच लहानाची मोठी झाली होती. ह्या जंजाळातून मरणाशिवाय सुटका नाही. कोणाच्या मरणाशिवाय? मनात हा विचार आला आणि तिथेच संपला. तिला स्वतः ला नक्कीच मारायचं नव्हतं. ओटा साफ करून बीजिंग मधले खरकटे भांडे अवरून ती खोलीत जायला निघाली.

इथे झोपते का आज? मला खूप एकटं पडल्या सारखं वाटतं.

मघापासून कटकट करणारी सासू एकदम भित्र्या सश्या सारखी वाटली तिला. भडभडून आलं. आपलं तर सख्खे रक्ताचे कोणीच नातेवाईक नाहीत. त्यांनी तीन वर्षात नवरा आणि मुलगा गमावला होता.

ती काहीच बोलली नाही. आत जाऊन स्वतः चं पांघरून घेऊन आली. इथे जास्त थंड वाटतं असं तिला वाटलं. सगळी कडे एक विचित्र शांतता दाटली होती. सासू पलंगावर आणि ती सोफ्यावर आडवी झाली. मधेच तिला आज फाटलेली ओढणी आठवली. त्याला डागडुजी केली तर उरलेले थंडीचे दिवस निभतील म्हणून ती सुई दोरा घेऊन शिवायला बसली. चुर चुर झालेली ओढणी नीट शिवल्या जात नव्हती. पण तिनी कसं तरी फाटलेला भाग शिवून काढला.

तितक्या वेळात सासू अखंड बोलत होती की दिवा मालव मला झोप लागत नाही उजेडात.

तिने ओढणी बाजूला ठेवली आणि दिवा मलावला. झोप लागत नव्हती. आणि तिला प्रकर्षाने जाणवलं की ती सासू शी एकही शब्द बोलली नाही. खरंच त्या कसा दिवस काढत असतील? सासर्यांना हिने पहिलेच नव्हते. ते गेले आणि हिला लग्न करून घरात आणलं. त्यांना ती पाहिले पासून आवडत नव्हती कारण ती अनाथ होती. पण मुलासमिर काहीच चालत नव्हतं. मुलगा असे पर्यंत त्यांनी तिला सहन केलं आणि आता मुलगा गेल्यावर कोणीच नाही उरलं म्हणून स्वीकारून घेतल्या सारखं दाखवत होत्या. तिचं वैवाहिक आयुष्य पण सुखाचं नव्हतं च. सासू सतत त्यांच्या संसारात हजर होती आणि अचानक सगळं संपलं. कोरोना झाला, आणि दहा दिवसात नवरा गेला. घरातून गेला तो परत डोळ्याने दिसला नाही. ना प्रेत ना विधी.

बसलेला धक्का सहन करायला सुद्धा फुरसत मिळाली नाही. खायचे फाके पडायला लागले आणि मिळेल ते काम ही करायलर लागली. काही दिवस तर समोरच्या दवाखान्यात तिने पोळी भाजी सुद्धा करून विकली. कसातरी कोरोना संपला आणि ही नोकरी मिळाली. पण अजूनही सासू तिला आपलं मनात नव्हती. औषध कुठे लपवले म्हणून त्यांना विचारवं वाटलं तिला. पण त्या संथ लयीत घोरत होत्या. आतापर्यंत न जाणवलेलर घोरण्याचा आवाज तिला त्रास द्यायला लागला. ती हळूच उठली आणि स्वतः क्या खोलीत येऊन झोपली. खोली म्हणजे काय गॅलरीला टिन शेड लावून केलेली जागा होती. कसाबसा एक पलंग आणि एक कपाट तिथे मावत होतं. पण तितक्या छोट्या जागेतही तिने नवऱ्यासोबत सुख अनुभवलं होतं.

आत आल्यावर झोप लागेना. झोप पूर्ण उडाली होती.

पहाटे पहाटे कधीतरी झोप लागली.

दिवस रोज सारखा उगवला. सासूबाई घोरत होत्या. तिला अगदी कंटाळा येत होता उठायचा. पण इलाज नव्हता. तिच कामं, तेच ऑफिस, तेच घर, तेच जेवण, तिच कटकट, अगदी कंटाळा आला तिला. कधीतरी एखादा दिवस वेगळा निघेल का? पोळ्या करता करता सतत तिच्या मनात हे विचार येत होते. मध्येच चहा आण करून सासूबाईंनी आवाज दिला. त्या पलंगावर बसल्या बसल्या स्वतः जवळची एकमेव शाल चोपून चोपून घरी करत होत्या.

चहा आणि चार मारीचे बिस्कीट त्यांना देऊन म्हणण्यापेक्षा त्यांच्या समोर आदळून ती परत कामाला लागली. आज सारखे तिचे डोळे भरून येत होतें. साध्यासाध्या रोजच्या उपयोगाच्या वस्तू सुद्धा आपल्याजवळ नाहीत. थंडी लवकर संपेल तर बरं होईल. ह्या वर्षी जरा पैसे **(पान ६ वर)**












# सलमान खानला ६ वर्षांत १२ पेक्षा जास्त वेळा जीवे मारण्याच्या धमक्या



## कोणी केलेला फोन?

बॉलिवूड अभिनेता सलमान खान गेल्या २ वर्षांपासून कडक सुरक्षेत राहत आहे. त्याचं मोठं कारण म्हणजे लॉरेन्स बिश्नोई गँगकडून त्याला सातत्याने धमक्या येत आहेत. त्याच्या घरावरही हल्लेखोरांनी गोळीबार केला आहे. याच दरम्यान त्याला सतत मिळणाऱ्या धमक्या पाहता मुंबई पोलिसांनी त्याला वाय प्लस सुरक्षा दिली आहे. यानंतरही वारंवार त्याच्या जीवाला धोका असल्याचे फोन येत आहेत.

दोन कोटी रुपये पाठवा अन्यथा जीवे मारण्याची धमकी सलमानला आता देण्यात आली. मुंबई वाहतूक पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला हा धमकीचा कॉल आला होता. यानंतर पोलिसांना सतर्क करण्यात आलं आहे. अलीकडच्या काळात सलमान खानला कधी धमक्या आल्या त्याबाबत जाणून घेऊया...

**याआधी किती वेळा आल्या धमक्या?**

**२५ ऑक्टोबर २०२४**

२५ ऑक्टोबर २०२४ रोजी सलमान खानला जीवे मारण्याची धमकी आली होती. धमकी देणाऱ्या आरोपीला मुंबई पोलिसांनी मंगळवारी नोएडा येथून अटक केली. मोहम्मद तैय्यब (२०) असं त्याचं नाव आहे.

**१८ ऑक्टोबर २०२४**

१८ ऑक्टोबरला सलमानला धमकीचा फोनही आला होता. या प्रकरणी पोलिसांनी झारखंडमधून आरोपीला अटक केली होती. आरोपीने मुंबई वाहतूक नियंत्रण कक्षाला व्हॉट्सप मेसेजद्वारे आपण लॉरेन्स गँगचा सदस्य असल्याचं सांगितलं होतं. तसेच सलमान खानची अवस्था बाबा सिद्दिकी यांच्यापेक्षाही वाईट होईल असंही म्हटलं.

**१४ एप्रिल २०२४**

१४ एप्रिल रोजी सकाळी सलमानच्या वांद्रे येथील गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये गोळीबार झाला होता. या हल्ल्याची जबाबदारी लॉरेन्स ग्रुपने घेतली. यानंतर सलमानची सुरक्षा आणखी वाढवण्यात आली.

जानेवारी २०२४

सलमान खानच्या फार्म हाऊसमध्ये दोन अज्ञात लोकांनी कुंपणाची तार तोडून आत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला होता. पोलिसांनी पकडल्यावर दोघांनी सलमानचे चाहते असल्याचं सांगितलं. त्यांच्याकडून बनावट आधार कार्ड जप्त करण्यात आले. या कारणास्तव या दोघांविरुद्ध एफआयआरही दाखल करण्यात आला होता.

**नोव्हेंबर २०२३**

सलमान खानला फेसबुकच्या माध्यमातून ही धमकी मिळाली होती. ही धमकी पंजाबी गायक गिप्पी ग्रेवाल यांना लॉरेन्स बिश्नोईचा फोटो असलेल्या फेसबुक अकाऊंटवरून देण्यात आली होती, मात्र त्यात सलमान खानच्या नावाचाही उल्लेख होता.

**एप्रिल २०२३**

एप्रिलमध्ये सलमान खानला १६ वर्षीय अल्पवयीन मुलाकडून धमकी देण्यात आली होती. त्याने मुंबई पोलिसांना फोन करून ३० एप्रिल २०२३ ला सलमानला मारणार असल्याचं सांगितलं.

मार्च २०२३

सलमान खानला जोधपूरमधून धमक्या आल्या आहेत. सलमानच्या अधिकृत मेलवर ३ ई-मेल पाठवले होते. त्यात लिहिलं होतं की, सलमान खान पुढचा नंबर तुझा आहे, तू जोधपूरला येताच तुला सिद्धू मूसवालाप्रमाणे मारलं जाईल.

**वर्ष २०२२**

यावर्षी लॉरेन्स बिश्नोई गँग शूटर संपत नेहराच्या गॅलेक्सी अपार्टमेंटमध्ये पोहोचल्यानंतर हल्लेखोर त्याच गॅलेक्सी अपार्टमेंटपासून थोड्या अंतरावर असलेल्या जॉगिंग पार्कमध्ये पोहोचले होते, जिथे सलमानचे वडील सलीम खान रोज मॉर्निंग वॉक करायचे. सलीम खान मॉर्निंग वॉकनंतर ज्या बाकावर बसायचे, त्यावर हल्लेखोरांनी धमकीचे पत्र ठेवलं होतं.

२०१९

लॉरेन्स बिश्नोईचा खास शूटर संपत नेहरा यावेळी सलमान खानला मारण्याच्या अगदी जवळ आला होता. त्यानंतर आरोपींनी गॅलेक्सी अपार्टमेंटच्या बाहेर रेकी केली होती, परंतु त्यावेळी त्यांच्याकडे असलेल्या शस्त्राची रेंज कमी होती. त्यामुळेच सलमान खानवर हल्ला करण्याचा प्लॅन पुढे ढकलला.

**२०१८**

जोधपूर कोर्टात सलमान खानला पहिल्यांदा जीवे मारण्याची धमकी मिळाली होती. गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई जोधपूर कोर्टात हजर असताना पहिल्यांदा म्हणाला होता की, आम्ही सलमानला जोधपूरमध्येच मारणार आहोत.

# शाहरुख खानसोबत त्याची लाडकी लेक सुहाना मोठ्या पडद्यावर करणार पदार्पण



शाहरुख खान हा बॉलिवूडचा बादशाह म्हणून ओळखला जातो. शाहरुखला आपण विविध सिनेमांमधून अभिनय करताना पाहिलंय. शाहरुखने २०२३ ला पठाण, जवान, डंकी या तीन सुपरहिट सिनेमांमधून लोकांच्या मनावर चांगलंच राज्य केलं. शाहरुख लवकरच त्याचा वाढदिवस साजरा करणार आहे. त्यानिमित्ताने शाहरुख एक मोठी घोषणा करणार आहे. त्यामुळे शाहरुखच्या वाढदिवशी चाहत्यांना मोठं सरप्राइज मिळणार आहे.

शाहरुख खान वाढदिवशी मोठी घोषणा करणार आहे. त्यापैकी एक मोठी गोष्ट म्हणजे शाहरुख खान त्याच्या आगामी 'किंग' सिनेमाची अधिकृत घोषणा करणार आहे. शाहरुख त्याच्याा वाढदिवशी अर्थात २ नोव्हेंबरला 'किंग' सिनेमाचं पोस्टर किंवा सिनेमाच्या मोशन पोस्टर रिलीज करणार आहे. या सिनेमात शाहरुख खानसोबत त्याची लाडकी लेक सुहाना मोठ्या पडद्यावर पदार्पण करणार आहे.

शाहरुखचा वाढदिवस २ नोव्हेंबरला आहे. शाहरुखचा ५९ वा वाढदिवस आहे. शाहरुखच्या वाढदिवसाला २५० लोक सहभागी होण्याची शक्यता आहे. रणवीर सिंग, सैफ अली खान, करीना कपूर खान, करिश्मा कपूर, एटली, जोया अख्तर, फराह खान, करण जौहर, अनन्या पांडे, आलिया भट हे कलाकार सहभागी होणार आहेत.

शाहरुख सर्वांसाठी जंगी पार्टी आयोजित करणार आहे. त्यामुळे शाहरुखचा यंदाचा वाढदिवस चांगला असणार यात शंका नाही.

# 'पंचायत सीजन ४' ची शूटिंग सुरू

## फुलेरा गाव पुन्हा गजबजले



ओटीटी प्लॅटफॉर्मवर अनेकांची आवडती सिरीज म्हणजे पंचायत. मेझॉन प्राईमवर भारतातील लोकप्रिय वेब सिरीजमध्ये 'पंचायत'चा समावेश होतो. या वेब सिरीजच्या तीनही सीजनला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतल्यानंतर पंचायतच्या चौथ्या सीजनची प्रेक्षकांना उत्सुकता आहे. त्यामुळे चाहत्यांना सुखावणारी एक बातमी प्राईम व्हिडिओजने दिली आहे. 'पंचायत सिझन ४' शूटिंग सुरू झाला असून प्रेक्षकांचं आवडतं फुलेरा गाव आता पुन्हा गजबजले आहे. जितेंद्र कुमार चंदन रॉय आणि फैजल मलिक यांची स्टारकास्ट असणारा पंचायत ४ च शूटिंग झालंय. शूटिंग दरम्यानचे फोटोही समोर आले आहेत. या फोटोमध्ये प्रधानजी आणि सचिवजी दिसत आहेत.

### दिवाळीचा मुहूर्तावर फोटो शेअर


टीव्हीएस च्या लोकप्रिय वेब सिरीज पंचायत सीजन ४ चं शूटिंग आता सुरू झालाय. प्राईम व्हिडिओने त्यांच्या अधिकृत इंस्टाग्राम पेज वरून फुलरा गावात सुरू झालेल्या शूट विषयी फोटो पोस्ट करत चहात्यांना सुखद धक्का दिलाय. हे फोटो शेअर करत र्गिष ने खाली, 'ए भूतकून, चार कप चहा बोलती जाये' असं लिहिलं आहे. यावर चाहत्यांनी अनेक प्रतिक्रिया दिल्या आहेत. अनेकांनी आज खरोखरच धनत्रयोदशी आहे असं लिहीत या फोटोजला लाईक केलंय.

### पंचायत४ ची स्टार कास्ट, निर्मिती

पंचायत सीजन फोर ची निर्मिती व्हायरल फीवर टीव्हीएफने केली आहे. चंदन कुमार यांनी लिहिलेली कथा दीपक कुमार मिश्रा आणि अक्षत विजयवर्गीय यांनी दिग्दर्शित केली आहे. पंचायत या वेब सिरीजमध्ये जितेंद्र कुमार, रघुवीर यादव, नीना गुप्ता, चंदन रॉय, फैसल मलिक, पंकज झा यांची मुख्य भूमिका आहे.

# विधानसभा निवडणुकीत पैशांचा महापूर!

## १५ दिवसात १८७ कोटी ८८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१मुंबई** – राज्यात सगळीकडे निवडणुकीचं वारं वाहत आहे. यातच राज्यात निवडणुकीसाठी पैशांचा महापूर आल्याचं चित्र प्रशासकीय कारवाईतून दिसून येते. राज्यात १५ ऑक्टोबर रोजी निवडणुकीचं बिगुल वाजताच आचारसंहिता लागू झाली. त्यानंतर प्रशासनाने कठोरपणे नाकाबंदी, तपासणी करून बेकायदेशीर कृत्यावर कारवाई करणे सुरू केले.

निवडणुकीची आचारसंहिता लागताच राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे ही कारवाई करण्यात येत आहे. त्यात बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत १५ ते ३० ऑक्टोबर २०२४ पर्यंत एकूण १८७ कोटी ८८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली. निवडणूक आचारसंहितेच्या काळात सजगपणे कार्यरत असलेल्या राज्यातील विविध अंमलबजावणी यंत्रणांनी ही कामगिरी केली आहे. विविध ठिकाणी पोलीस विभाग आणि इतर यंत्रणांनी उभारलेले तपासणी नाके योग्य पद्धतीने कार्यरत असल्यामुळे हे यश मिळाले आहे असं निवडणूक आयोगाने म्हटलं.

तसेच या कारवाईत प्रामुख्याने राज्य पोलीस विभागाने सुमारे ७५ कोटी रूपये, इन्कमटॅक्स विभागाने सुमारे ६० कोटी रूपये, राज्य उत्पादन शुल्क विभागाने सुमारे ११ कोटी रूपये यांचा प्रामुख्याने समावेश आहे. मतदारांना आचारसंहिता भंगाचा प्रकार आढळल्यास आयोगाच्या 'सी-व्हिजील' पवर तक्रार करता येते. या तक्रारींची माहिती सर्व अंमलबजावणी यंत्रणांना दिली जात असल्याने आवश्यक ठिकाणी जप्तीची कारवाई केली जात आहे असं निवडणूक आयोगाने सांगितले.

### पालघर, खेड शिवापूरमध्ये सापडली कोट्यवधीची रक्कम

मुंबई अहमदाबाद मार्गावरील उधवा येथील चेक पोस्टवर ४ कोटी २५ लाख रुपयांची रोकड पोलिसांनी केली जप्त केल्याची माहिती समोर येत आहे. केंद्रशासित प्रदेशातील सिलवासा येथे एका बँकेतून दुसऱ्या बँकेत ही रोकड नेण्यात येत होती असं सांगण्यात आले. बँकेच्या अधिकाऱ्यांचं म्हणणं पोलिसांनी ऐकले परंतु ही रोकड महाराष्ट्र राज्याच्या बॉर्डरवर आली कशी? असा प्रश्न पालघर पोलिसांनी उपस्थित केला आहे. सध्या या रोख रकमेची अधिक चौकशी सुरू असल्याची माहिती पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी दिली. निवडणुकीची घोषणा झाल्यापासून राज्यात विविध ठिकाणी रोकड, दारू जप्त करण्यात येत आहे. याआधी पुणे बंगळुरू हायवेवर खेड शिवापूर टोल नाक्याजवळ खासगी कार पोलिसांनी अडवली. त्यावेळी या कारमधून पोलिसांनी जवळपास ५ कोटींची रक्कम जप्त केली होती.







# आदर्श दिवाळी !



**प्रस्तावना –**
'तमसो मा ज्योतिर्गमय'
या श्लोकाचा अर्थ : 'हे भगवंता ! आपण
मला असत्याकडून
सत्याकडे,अंधकारातून प्रकाशाकडे न्यावे
'अशी प्रार्थना आहे.
प्रत्येक प्राणिमात्रांची
धडपड प्रकाशाकडे जाण्याची असते. ज्या
स्थितीत आहोत त्याच्या पुढील स्थितीत जाण्यासाठी, प्रगती करण्याकडे असते.

अर्थात नकारात्मकते कडून सकारात्मकतेकडे जायचे असते. जीवनात सकारात्मकता शिकवणारा, प्रकाशाकडे वाटचाल करण्यास शिकवणारा सण म्हणजे दिवाळी.

**सत्याच्या विजयाचे प्रतिक !** – प्रभू श्रीरामचंद्र हे १४ वर्षाचा वनवास पूर्ण करून दिवाळीच्या दिवशी अयोध्येत परत आले. प्रभू श्रीरामचंद्राच्या आगमनाने प्रजेला खूप आनंद झाला. त्यांच्या स्वागतासाठी संपूर्ण अयोध्या नगरीत घरोघरी तुपाचे दिवे लावून आनंद व्यक्त करण्यात आला. प्रभू श्रीराम सत्याचे मूर्तिमंत रूप असल्याने त्यांचा विजय म्हणजे सत्याचाच विजय होता. या विजयाचा उत्सव म्हणून आपण दिवाळी दीपोत्सव, प्रकाशोत्सव म्हणून साजरी करतो.

**सकारात्मकता वाढविणारा सण !** – दिवाळी जवळ येताच घर, दुकाने, आस्थापने, आपल्या आजूबाजूचा परिसर,शहर यांची स्वच्छता सुरू होते. जाळे जळमटे काढून रंगरंगोटी केली जाते. तुटक्या फुटक्या साहित्याची डागडुजी होते. त्यामुळे स्वच्छता आणि नीटनेटकेपणा यांसोबतच वातावरणातील सकारात्मकता वाढते. त्याचा प्रत्येक जिवाच्या मन आणि बुध्दीवर सकारात्मक परिणाम होतो. मनातील नकारात्मकता दूर होऊन आपल्याला आनंद प्राप्त होतो.

## गुणवृद्धीसाठी लक्ष्मीपूजन !

लक्ष्मीपूजन हे अश्विन अमावस्येला संध्याकाळी करतात. तसेच रात्री बारा वाजता अलक्ष्मी निःसारण करतात. शास्त्रानुसार लक्ष्मीपूजनामुळे पूजाकरणाऱ्याला लक्ष्मी तत्वाचा लाभ होतो. तो टिकवून ठेवण्यासाठी धर्माचरण करणे आवश्यक आहे. अधर्माची कास धरली किंवा कर्तेपणा निर्माण झाला तर आपण स्थिर राहू शकत नाही. लक्ष्मी चंचल आहे ! असे म्हणतात, पण खरेच लक्ष्मी चंचल आहे का ? याचे उत्तर नाही असे आहे. ती नेहमीच भगवंताच्या अनुसंधानात स्थिर असते. जेथे अनुसंधान असते, जिथे धर्माचरण असते तिथे लक्ष्मी विराजमान होते. ऐशर्य, सौंदर्य, शांती, सत्य, समृद्धी आणि संपत्ती याची अधिष्ठात्री देवी श्री लक्ष्मी कमलासनावर विराजमान होऊन समुद्रमंथनातून आली.

अशा या लक्ष्मीचे वर्षातून केवळ एकदा पूजन करून ती प्रसन्न होईल का ? तिला प्रसन्न ठेवायचे असेल तर कमळ ज्या प्रमाणे चिखलातून बाहेर येते त्या प्रमाणे स्वभाव दोषांचा चिखल दूर सारून धर्माचरण करायला हवे. असे धर्माचरण करीत ईशराच्या अनुसंधानात रममाण झाल्यास श्री लक्ष्मी हृदयकमळावर निश्चितच विराजमान होईल. तसेच धन धान्याच्या रूपात आपल्याजवळ स्थिर होईल. आपल्यातील दुर्गुण घालविण्यासाठी प्रयत्न करणे महत्वाचे आहे, तेच खऱ्या अर्थाने अलक्ष्मी निःसारण होय.

## सांप्रत काळातील दिवाळीचे बदलते स्वरूप !

– समृद्धीकडे, आनंदाकडे, प्रकाशाकडे नेणारी दिवाळी आहे. परंतु, सद्य परिस्थिती बघता दिवाळी म्हणजे देवता, थोरपुरूष यांची चित्रे असणाऱ्या फटाक्याची आतशबाजी, चित्रपटातील गाण्यांनी रंगणारी दिवाळी पहाट, डोळ्यांना त्रासदायक आणि घातक ठरणाऱ्या चिनी दीपमाळा आणि आकाशदिवे यांचा झगमगाट या सगळ्यामुळे दिवाळीचे संपूर्ण स्वरूप बदलून गेले आहे. यामुळे नकारात्मकता वाढते आहे. ज्या लक्ष्मीची घरात पूजा करतो तिचेच फोटो असलेले फटाके फोडून आपण चिंध्या करतो. हे योग्य आहे का? अश्याने ती प्रसन्न होईल का ?

घरात केलेल्या पूजेचा काही परिणाम न होता यातून देवतांचे विडंबन होणार आहे. या विडंबनातून होणारे पातक जर आपल्या कृतीतून घडत असेल तर ती पूजा फलित होईल का ? त्याचप्रमाणे अश्या चुकीच्या कृतीमुळे युवा पिढी समोर आपण काय आदर्श ठेवणार ? याचा विचार करायला हवा. स्वदेशी आणि पारंपरिक सहित्यापेक्षा झगमगाट आणि इन्स्टंटकडे कल वाढतो आहे.हि परिस्थिती बदलायला हवी त्यामुळे आपल्याला दिवाळीचा खरा आनंद मिळू शकेल. आदर्श दिवाळी साजरी करण्याचे ध्येय घेऊया ! – देवता, थोरपुरूष यांच्या फटाक्यांची विक्री होत असल्यास हिंदूंनी एकत्र येऊन त्या विषयी प्रबोधन करायला हवे. आपल्या संपर्कात येणाऱ्या बाल आणि युवकांचे प्रबोधन करायला हवे.दिवाळी पहाट मधे होणाऱ्या अशास्त्रीय आणि अश्लील गाण्यांच्या ऐवजी भावभक्ती तसेच देशप्रेम निर्माण करणाऱ्या गाण्यांसाठी आग्रह धरायला हवा.भावी पिढीचा कौशल्य विकास व्हावा, त्यांच्यात हिंदूधर्म – राष्ट्र – संस्कृती विषयी प्रेम आणि कृतज्ञता भाव निर्माण व्हावा यासाठी रांगोळी स्पर्धा, किल्ले स्पर्धा, परिसर स्वच्छता आणि सजावट स्पर्धा घ्यायला हव्या.शरीर आणि पर्यावरणावर घातक परिणाम करणारे विदेशी आणि चिनी उत्पादने न घेता स्वदेशी आणि हलाल मुक्त उत्पादने घेऊया. त्या विषयी स्वतः जागरूक राहून कृती करुन इतरांनाही जागृत करायला हवे. अशी आदर्श दिवाळीच आपल्याला ' मृत्योर्मा अमृतं गमय'

## अर्थ :

मृत्यूपासून जीवनाकडे वाटचाल करायला शिकवते. त्यातूनच आपले जीवन अमृता समान आनंदी होत असते. आपल्या कुलदेतेचे स्मरण करून तिलाप्रार्थना करूया, 'हे भगवंता! आपणच आमच्या कडून आदर्श दिवाळी यंदाच्या वर्षी पासून साजरी करवून घ्या. आमच्या वैयक्तिक उन्नती सोबतच राष्ट्र – धर्म यांच्या रक्षणासाठी आणि उन्नतीसाठी आमच्याकडून धर्माचरण करून घ्या हीच प्रार्थना आहे.'

**सौजैजन्य –**
**सनातन सस्था**
**सकंकलक**
**श्रीमती विभा चौधैधरी**
**, सपंपक**
**'–७६२०८३१४८७**

# का साजरी केली जाते दिवाळी ?



## जाणून घ्या पौराणिक कथा

हिंदू धर्मात वर्षभरात अनेक सण–उत्सव साजरे केले जातात त्यात दिवाळी हा एक महत्त्वाचा आणि प्रमुख सण आहे. दिवाळी हा असा सण आहे जो फक्त भारतातच नाही तर जगभराती अनेक देशांमध्ये मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो पंचांगानुसार, यंदा आश्विन कृष्ण पक्षातील अमावस्या तिथीला दिवाळी आणि लक्ष्मीपूजन केले जाईल. दिवाळी हा सण सामान्यतः दिव्यांचा सण मानला जातो, दिवे हे सकारात्मकाता, अधकारावर प्रकाशाची मा सत्य आाणि रामराज्याचे प्रतिक मानले जाते या दिवशी दिव्यांनी घर सजवून, धार्मिक विधीचे पालन करून पूजा केली जाते. मान्यतेनुसार, वसुबारस तिथीने दिवाळीपर्वास प्रारंभ होतो आणि भाऊबीजपर्यंत चालतो असा हा दिवाळी सण का साजरा केला जातो जाणून घेऊया

रामायणाशी आहे विशेष संबंध

हिंदू धर्मातील महत्त्वाच्या अशा दिवाळीचा संबंध रामायणाशी आहे. पौराणिक कथेनुसार, दिवाळी तिथीला १४ वर्षाच्या वनवासानंतर आणि रावणाचा वध केल्यानंतर मर्यादा पुरुषोतम प्रभू श्रीराम हे अयोध्येत परतले मान्यतेनुसार, प्रभू श्रीरामाने चौदा वर्षांसाठी वनवास भोगला होता यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे भाऊ लक्ष्मण आणि पत्नी देवी सीताही होत्या. वडिलांच्या आज्ञेनुसार, प्रभू श्रीरामांनी वनवास काटला या काळात त्यांनी वनवासात विविध आव्हाने आणि समस्याना तोंड देत मार्गक्रम केले. याच कालावधात त्याची हनुमानासह त्याच्या वानर सेनेशी भेट झाली तनवासादरम्यान, रावणाने देवी सीतेचे अपहरण केले होते सताचा वेश धारण करून भिक्षा मागण्यासाठी आलेल्या रावणाने विश्वासघात करत देवी सीतेचे अपहरण केले होते.देवी सीतेचे अपहरण हेच प्रभू श्रीराम आणि रावणातील युद्धाचे प्रमुख कारण ठरले देवी सीतेच्या शोधात निघालेल्या प्रभू श्रीरामांनी पुढे चालून लक्ष्मण, हनुमान आणि वानर सेनेला सोबत घेत शेवटी रावणाचा वध केला आणि देवी सीतेचे रक्षण केले. दरम्यान, हनुमानाने रावणाची लका देखील भस्म केल्याची पौराणिक कथा आहे एकदरीत प्रभू श्रीरामानी रावणाचा वध केला म्हणजेच वाईटावर चांगळ्याचा विजय झाला त्यानंतर, प्रभू श्रीराम हे देवी लक्ष्मी, लक्ष्मण यांच्यासोबत अयोध्या परतले तेव्हा वाईटावर चागल्याच्या विजयाचे प्रतीक म्हणून अयोध्या नगरीत दीपोत्सव साजरा केला गेला वनवासातून परत अयोध्येत श्रीरामाच्या आगमनाने अयोध्या नगरीत आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या आनंदोत्सवात सपूर्ण राज्य रोषणाईने सजले होते. नगरवासियांनी रांगोळी, पुष्पवृष्टी व दिवे लावून प्रभू श्रीरामाचे स्वागत करत पूजन देखील केले. या वेळी रात्रीचा अधकार दूर करण्यासाठी तेलाचे दिवे (दिवे) लावण्यात आले होते अशा प्रकारे नूतनीकरण आणि धर्माच्या विजयाचे प्रतीक म्हणून रामायण काळापासून दिवाळी सण साजरा केला जात आहे.

# वात्सायन ऋषींनी रांगोळी काढण्याच्या कलेला चौसष्ट कलांमध्ये मान का दिला जातो !



रांगोळी म्हणजे मन प्रसन्न करणारी कला. विशिष्ट दगडांचे शुभ्र चुर्ण चिमटीत धरून जमिनीवर सोडून आकर्षकपणे रेखाटलेल्या आकृतीला रांगोळी असे म्हणतात. रांगोळी काढणे ही एक अनुपम कला असून तिचा मूळ उग धार्मिक अनुबंध व रचनेतून आला आहे.

धार्मिक व मंगल कार्यात रांगोळीचे महत्त्व अग्रस्थानी आहे. सण, उत्सव, मंगल कार्य, धार्मिक कार्यक्रम, व्रतवैकल्ये इ. शुभ प्रसंगी सर्वप्रथम धर्मकृत्याच्या स्थानी रांगोळी काढण्याचा कुळाचार आहे. एखाद्याला ओवाळताना ती व्यक्ती बसलेल्या पाटाभोवती रांगोळी रेखाटतात. वाढदिवस, अभिष्टचिंतन, मुंज या व अशा समारंभांच्या भोजनप्रसंगी पाट–पानाभोवती रांगोळी काढतात. दिवाळीच्या सणात दारापुढे किंवा अंगणात विविध प्रकारच्या अर्थगर्भ रांगोळ्या काढून त्या विविध रंगांनी भरतात. दिवाळीत जसे दीपोत्सव साजरे करतात, तसे आता विविध ठिकाणी रांगोळी प्रदर्शन भरवून रांगाळीचे आगळे दर्शन घडवतात. पूर्वीच्या काळी प्रत्येक घरी नित्य नेमाने दारापुढे सडासंमार्जन करून रांगोळी काढण्याची प्रथा होती. रांगोळ्या शिरगोळ्याच्या चूर्णाने काढतात. कोकणात भाताची फोलपटे काढून ती जाळून त्यांची पांढरी राख रांगोळी म्हणून उपयोगात आणतात.सौंदर्याचा साक्षात्कार व मंगलाची सिद्धी हे रांगोळीचे उद्देश आहेत. रांगोळीत ज्या आकृत्या रेखाटतात, त्या प्रतीकात्मक असतात. सरळ रेषेपेक्षा वक्र रेषा ही सौंदर्याची अनुभूती घडवते. अशा वक्ररेषा आणि बिंदू, त्रिकोण, चौकोन व वर्तुळ यांतून विविध प्रकारे प्रतीकात्मक आकृत्या निर्माण करता येतात. पाटाभोवती रांगोळीचा चौकोन काढला तर त्याला समोरच्या रेषेवर त्रिकोण काढतात. चौकोनाची आडवी रेघ हा त्या त्रिकोणाचा पाया असतो. त्रिकोणाच्या शिरोभागी एक वर्तुळ काढतात. त्यामुळे रेषेला मखराचे स्वरूप येते. चौकोनाचे कोपरे रिकामे ठेवण्याची चाल नाही. त्याच्या कोपऱ्यांवर रांगोळीची एक चिमूट ओढून तिथे त्रिदळाची प्रतिकृती काढतात. हे त्रिदळ त्रिभुवन, तीन देव, तीन अवस्था आणि त्रिकाल म्हणजे पर्यायाने त्रिधा विभक्त अशा विशतत्त्वाचे प्रतीक असते.रांगोळीचे आकृतीप्रधान व वल्लरीप्रधान असे मुख्य दोन भेद आहेत. आकृतिप्रधान रांगोळी राजस्थान, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, दक्षिण भारत या प्रदेशात आढळते. तिच्यात रेखा, कोन आणि वर्तुळ प्रमाणबद्ध असतात. वल्लरीप्रधान रांगोळी हिंदुस्थानच्या पूर्व भागात आढळते. या प्रकारात फूलपत्री, वृक्षवल्ली, पशुपक्षी यांना प्राधान्य असते. अशी रांगोळी काढण्यात बंगाली स्त्रिया सिद्धहस्त असतात. बंगाल मधील अलिपना, मध्यप्रदेशातील चौकपूरना, गुजरातमधील साथिया, राजस्थानमधील मांडना, आंध्रप्रदेशातील मुगू, तामीळनाडूमधील कोलम, केरळ मध्ये पूविडल, कर्नाटक मध्ये रंगोळी हे सगळे रांगोळीचे प्रादेशिक प्रकार आहेत.

दिवाळीची रांगोळी, पूजेची रांगोळी, कासवाकृती, कमलाकृती, तुळशीवृंदावन असे रांगोळीचे नानाविध प्रकार आहेत. भाद्रपद मासात गौरीची प्रतिष्ठापना करण्यापूर्वी सडासंमार्जन झाल्यावर दारापासून ते घरापर्यंत सर्वत्र त्यांची पाऊले रांगोळीने काढतात. मग त्यावरून सुवासिनी त्यांचे मुखवटे घंटानाद करत घरात आणतात. याशिवाय चैत्रमासातअंगणाचा व प्राची जोशी दारासमोरचा एक कोपरा गोमयाने सारवण करून त्यावर सांकेतिक प्रतीक असलेली रांगोळी रेखाटून त्याला हळद, कुंकू आणि फुले वाहतात. त्याला चैत्रांगण म्हणतात. चैत्रांगणामध्ये तुळशी वृंदावन, राधाकृष्ण, स्वस्तिक, लक्ष्मीची पावले, कमळ, शंख, हत्ती,सूर्य, मुलींच्या खेळांच्या विविध प्रकारच्या आकर्षक नाविन्यपूर्ण प्रतिमा रंगावलीने साकार करून स्त्रिया आनंदोत्सव साजरा करतात.रांगोळी ही भारतीय संस्कृतीचे कलात्मक प्रतिबिंब आहे. विविध कल्पनांचे, विचारांचे आणि श्रद्धांचे घडलेले आविष्कार म्हणजेच मानवी संस्कृती! रांगोळी हा असाच आविष्कार मानवी संस्कृतीने घडवलेला आहे. कलात्मक आणि सौंदर्यपूर्ण जीवनाचे उत्कट भावदर्श रांगोळीतून व्यक्त होते.

रांगोळी घालताना पाहून कवि केशवसूत लिहितात, आधि ते लिहिले तिने रविशशी नक्षत्रमाला तदा, मध्ये स्वस्तिक रेंखिले मग तिने आलेंखिले गोपेपदा। भूमी व आकाशातील सर्व उपकारक गोष्टींची रांगोळीतली ही चित्रे बघून कवी शेवटी म्हणतात, ऋहे सुभगे, तू तुझ्या या रांगोळीत स्वर्ग आणि भूमी यांचा अपूर्व संगम केला आहेस. तो अजून कुणालाही जमला नव्हता.' रांगोळी घालणाऱ्या स्त्रिच्या प्रतिभेचे सहजसुंदर कौतुक आहे. चौसष्ट कलांमध्ये रांगोळी कला प्रकाराचा उल्लेख वात्सायनाच्या कामसूत्रात आढळतो. त्यात म्हटले आहे की, रांगोळी म्हणजे मन प्रसन्न करणारी कला. रांगोळी काढणे ही एक अनुपम कला असून तिचा मूळ उगम धार्मिक अनुबंध व रचनेतून आला आहे. फलांची रांगोळी, धान्यांची रांगोळी, पाण्यावरील रांगोळी असे हे रांगोळीचे नेत्रसुखद स्वरूप दर्शनीय आहे. हिंदू, जैन व पारशी धर्मात रांगोळी शुभप्रद मानली जाते. रांगोळी अशुभापासून, दूषिता पासून रक्षण करते. ही पूर्वापार चालत आलेली कला संस्कृती आहे. म्हणून रांगोळीचे विलोभनीय रूपदर्शन पाहून ती मनामनाला भावते, फुले स्वस्तिके रांगुलीची लिहावी, अशी की, जने कौतुके ती पहावी!

# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक : काँग्रेसच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर

## तरुण चेहऱ्यांना संधी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मुंबई –** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा प्रचार सुरू झाला आहे. सर्व राजकीय पक्षांनी त्यांच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. काँग्रेसनेही आपल्या स्टार प्रचारकांची यादी निवडणूक आयोगाला सादर केली आहे. या यादीत काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, वायनाड लोकसभा मतदारसंघातून पोटनिवडणूक लढवणाऱ्या पक्षाच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांच्या नावांचा समावेश आहे. याशिवाय महाराष्ट्र प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेस कार्यसमिती सदस्य बाळासाहेब थोरात, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, मुंबई काँग्रेस अध्यक्षा वर्षा गायकवाड, खासदार प्रणिती शिंदे यांचीही नावे या यादीत आहेत.

**तरुण चेहऱ्यांनाही यादीत स्थान**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसचे सरचिटणीस मुकुल वासनिक, अविनाश पांडे, खासदार चंद्रकांत हंडोरे, आरीफ नसीम खान, सतेज (बंटी) पाटील, माजी केंद्रीय मंत्री सलमान खुर्शिद, विलास मुत्तेमवार, भाई जगताप, माजी मंत्री अमित देशमुख, विश्वजित कदम यांनाही स्टार प्रचारक बनवण्यात आले आहे. तरुण चेहऱ्यांनाही स्टार प्रचारकांच्या यादीत ठेवण्यात आले आहे. रणदीप सुरजेवाला, कन्हैया कुमार, इम्रान प्रतापगढ़ी, नदीम जावेद, जिग्नेश मेवाणी आणि महिला काँग्रेसच्या अध्यक्षा अलका लांबा हेही स्टार प्रचारक आहेत. हे सर्व स्टार प्रचारक महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत तसेच नांदेड लोकसभा जागेवर होणाऱ्या पोटनिवडणुकीत प्रचाराची धुरा सांभाळणार आहेत.

### कर्नाटक, तेलंगणाचे मुख्यमंत्री करणार प्रचार

काँग्रेसच्या सरचिटणीस कुमारी शैलजा यांनी स्टार प्रचारकांची यादी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे सादर केली आहे. या यादीत ४० नावांचा समावेश आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या, उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट, पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजितसिंह चन्नी, छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल हेही प्रचारासाठी जाणार आहेत.

# रिटर्न गिफ्ट



जवळ जवळ दोन तास नेहा साड्या बघत होती परंतु आवडलेल्या साड्या तीच्या बजेटमध्ये बसत नव्हत्या आणि बजेटमध्ये बसणाऱ्या साड्या तीला आवडत नव्हत्या. वैतागून सेल्समन म्हणाला मॅम, एकतर तुम्ही तुमचे बजेट वाढवा नाहीतर सिलेक्शन क्रायटेरिया बदलवा. नेहाला दहा हजार रुपयांची एक साडी खुप आवडली होती परंतु तिचे बजेट फक्त आठ हजार रुपयांचे होते. दादा, तुम्ही शेठजींना विचारून पहा ना काही डिस्काउंट मिळेल का? नेहाने विनवले.

त्याचवेळी दुकानात एकटाच आलेला एक रुबाबदार तरुण सेल्समनला म्हणाला, मला साडी घ्यायची आहे, कोण दाखवेल? सर पाचच मिनिटे थांबा, या मॅमचे झाले की तुम्हाला साड्या दाखवतो, तुम्ही इथेच बसा.

आमच्याकडे कोणताही डिस्काउंट दिला जात नाही, शेठजींनी सांगितले. पण जर तुमचा आज वाढदिवस असेल तर तुम्हाला १०% डिस्काउंट किंवा तुमच्याकडे अे बी सी बँकेचे क्रेडिट कार्ड असेल तर आम्ही तुम्हाला २०% डिस्काउंट देऊ शकतो.

माझा वाढदिवस पुढच्या रविवारी आहे आणि माझ्याकडे कोणतेही क्रेडिट कार्ड नाही, म्हणताना नेहा हिरमुसली.

मॅम माझ्याकडे अे बी सी बँकेचे क्रेडिट कार्ड आहे, तुम्ही ते वापरा. तुम्हाला २०% डिस्काउंट मिळेल, म्हणजेच साडी तुम्हाला हव्या असलेल्या किंमतीत मिळेल, तो तरुण म्हणाला.

खरंच? म्हणताना नेहा आनंदली. सर, मी तुमचे मनापासून आभार मानते म्हणणाऱ्या नेहाला त्या तरूणाने सांगितले, मॅम मला एक साडी घ्यायची आहे आणि मला साड्यांमधले काहीच माहीत नाही. तुमचं सिलेक्शन उत्तम आहे. साडी सिलेक्ट करायला तुम्ही प्लीज मला मदत कराल का?

का नाही ? अवश्य करीन, नेहा म्हणाली.

तुम्हाला साडी कोणासाठी घ्यायची आहे? नेहाने विचारले.

रीनुसाठी आय मीन, रीनासाठी, तो तरुण म्हणाला. रीना ताई कशा आहेत? म्हणजे त्यांची उंची, रंग वगैरे?

बिलकुल तुमच्या सारखीच उंची, रंग आणि झिरो फिगर. फरक एवढाच, तिचा शोल्डरकट नाही तर बॉबकट आहे.

सर, तुमचे बजेट किती? सेल्समनने विचारले. ७०-७५ हजार रुपये तो तरुण म्हणाला. सेल्समनने मोठ्या आदराने त्या तरुणाकडे बघितले आणि अतिशय आकर्षक साड्या दाखवायला सुरुवात केली. नेहा मन लावून आणि बारकाईने साड्या पहात होती. अनेक साड्यांपैकी दोन साड्या नेहाने बाजूला काढल्या. दोन्हीही साड्या खरोखरच खूप छान होत्या आणि विशेष म्हणजे त्या तरूणाने सांगितलेल्या बजेट मधीलच होत्या.

सर तुम्ही रीना ताईंना व्हिडिओ कॉल करून या दोन साड्या दाखवा आणि त्या पसंत करतील ती साडी घ्या.

नाही, नाही, मला रीनुला सरप्राईज द्यायचे आहे, त्यामुळे व्हिडिओ कॉल करता येणार नाही.

मॅम, मी दोन्हीही साड्या तुमच्या अंगावर कशा दिसतात ते दाखवतो. मग तुम्ही सिलेक्ट करा, सेल्समन म्हणाला.

दोन्हीही साड्या नेहावर खूपच खुलून दिसत होत्या. सर रीना ताईंसाठी ही साडी घ्या, नेहा म्हणाली. दादा या दोन्ही साड्या पॅक करा, तो तरुण म्हणाला.

सर रीना ताईंसाठी ह्या दोन्ही साड्या सारख्याच होतील, नेहा म्हणाली. तुम्हाला दोन साड्या घ्यायच्या असतील तर आपण एक दुसरी साडी घेऊ, नेहा म्हणाली.

मॅम, एक साडी रीनुसाठी आणि दुसरी माझ्या खास मैत्रिणीसाठी, तो तरुण नि:संकोचपणे म्हणाला.

सर थांबा, मी दोन्ही साड्या व्यवस्थित चेक करून घेते, नेहा म्हणाली. नेहाने पहिली साडी चेक केली आणि म्हणाली ही ठीक आहे. दुसरी साडी चेक करताना नेहा किंचाळली. साडीच्या बॉर्डर वरून वेगाने हात फिरवताना, साडीच्या प्राईस टॅगवर नीट न लावलेल्या पिनमुळे नेहाच्या नाजूक बोटाला मोठी दुखापत झाली आणि त्यातुन रक्त येऊ लागले. नेहाचे रक्त साड्यांच्या ढिगाऱ्यावर पडणार तेवढ्यात त्या तरुणाने नेहाचा हात हातात घेतला आणि त्यावर खिशातील पांढरा स्वच्छ हातरुमाल दाबून धरला.

पटकन संकोचून तो म्हणाला सॉरी मॅम, मी तुमची परवानगी न घेताच तुमचा हात हातात घेतला.

अहो सर, बरं झालं तुम्ही त्यांचा हात हातात घेतला, नाही तर त्यांच्या हातातील रक्त साड्यांवर पडले असते आणि शेठजींनी मोठी नुकसान भरपाई मागितली असती. प्रत्येक साडी सत्तर-पंच्याहत्तर हजारांच्या घरातील आहे.

साड्या घेतल्यावर तो तरुण म्हणाला, मॅम मी तुम्हाला घरी सोडतो. संकोचूनच नेहा तयार झाली. आलिशान गाडी चालवताना तो तरुण म्हणाला मॅम आपण आधी क्लिनिक मध्ये जाऊया आणि ड्रेसिंग करून इंजेक्शन घेऊ या.

नको सर, क्लिनिक मध्ये गेलो तर २००-३०० रुपये खर्च होतील. आधीच बजेटपेक्षा थोडी महाग साडी घेतली आहे त्यामुळे मला आता खुप काटकसर करायला लागणार आहे.

काय करता तुम्ही? त्या तरुणाने उत्सुकतेने विचारले.

सर, मी एका छोट्या कंपनीत रिसेप्शनिस्ट आहे, महिन्याला २००००/- रुपये पगार मिळतो. त्यातून घर भाडे, किराणा, ऑफिसला जाण्या-येण्याचा आणि इतर खर्च जाऊन जेमतेम २०००-३००० रुपये शिल्लक रहातात.

मी घरी जाऊन बोटावर हळद लावीन, तेवढेच पैसे वाचतील. काळजी करू नका मॅम, क्लिनिकला पैसे लागणार नाहीत.

सर, पण माझ्यामुळे तुम्हाला घरी जायला उशीर होईल आणि रीनाताई चिडल्या तर? चिडायला रीना काही माझी बायको नाही, मावस बहीण आहे, सरांनी स्पष्टीकरण दिले.

ज्या मैत्रिणीसाठी तुम्ही इतकी महाग साडी घेतली ती तुमची खुप जवळची मैत्रीण असणार? त्याही रीना ताईसारख्याच सुंदर आहेत का? काय करतात त्या? इथेच असतात का? नेहाच्या प्रश्नांना कोणतेही उत्तर मिळाले नाही.

आपण इतका वेळ बोलतोय परंतु आपल्याला एकमेकांचे नाव देखील माहित नाही, सर म्हणाले.

मी राज.

मी नेहा.

सर तुम्ही काय करतात? नेहाने विचारले. तेव्हढ्यात गाडी थांबवत सर म्हणालेत क्लिनीक आलेच.

क्लिनीकवर बोर्ड होता, डॉक्टर राज च. ऊ जनरल प्रॅक्टीशनर.

राजने हळुवार पुणे ड्रेसिंग करून इंजेक्शन दिले. उद्या सकाळी परत ड्रेसिंग करु या, नो फी, राज म्हणाला. नेहा संकोचली.

राजने नेहाला घरी सोडले. साडी कपाटात ठेवताना नेहाच्या लक्षात आले की तिने साडीचे पैसे राजला दिलेच नव्हते.

सकाळी नेहा क्लिनिकला लवकरच पोहोचली. पैसे देण्याच्या घाई बरोबरच कसली तरी ओढही होती.



दिलीप कजगांवकर
पुणे
७७७००२५५९६

राजने ड्रेसिंग केले पण नाराजीनेच साडीचे पैसे घेतले. नेहा पुढच्या रविवारी संध्याकाळी मी एक छोटीशी पार्टी देणार आहे. तु जर फ्री असशील तर येशील का? माफ करा नेहा मॅम, मला तू नाही तुम्ही म्हणायचे होते.

सर, मला अहो जाहो आवडत नाही. तुम्ही मला तू च म्हणा आणि जरूर येईन मी, नेहा म्हणाली.

संध्याकाळी ऑफिस मधून येताना बस सिग्नलला थांबली असताना बाजूलाच राजची कार येऊन थांबली. बाय राज म्हणत एक खूप सुंदर तरुणी गाडीतून बाहेर पडताना नेहाने बघितले. नेहाच्या मनात आले, कदाचित ती राजची बहीण रीना असेल का? नाही नक्कीच नाही. रीनाचा बॉब कट असल्याचे राजने सांगितले होते आणि हीचे केस तर लांब आहेत. राजची ती खास मैत्रीण तर नसेल ना? एक मात्र नक्की नेहाच्या मनात राजने विशेष स्थान निर्माण केले होते.

नेहाच्या ऑफिसच्या सहकाऱ्यांनी रविवारी संध्याकाळी एकत्र मुव्ही बघायचे ठरविले. अनवधानाने नेहाने येण्याचे मान्य केले. राज बरोबर जायचे की मुव्हीला जायचे? नेहाच्या मनात द्वंद्व सुरू झाले. मुव्हीला गेले नाही तर अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागेल. राज बरोबर जायचे नसेल तर त्याला कळविणार तरी कसे? त्याचा नंबरही नव्हता नेहाकडे.

नेहाला उत्तर सापडले, ऑफिसच्या सहकाऱ्यांना अर्धसत्य सांगायचे, डॉक्टरांबरोबर जायचे ऐवजी डॉक्टरांकडे जायचे सांगायचे.

रविवारी ठरल्यावेळी नेहा तयार होती. मागच्या आठवड्यात घेतलेल्या साडीवर नेहा खूपच सुंदर दिसत होती. राज अगदी वेळेवर आला. गाडीत बसल्यावर नेहाने मैत्रिणीला डॉक्टरांबरोबर ऐवजी डॉक्टरांकडे जाते सांगून स्वत:ची सुटका करून घेतली. नेहाने सांगितलेल्या अर्धसत्यावर दोघेही खळखळून हसलेत.

कार मधील रेडिओ एक गाजलेले गीत ऐकवत होता,

भेट तुझी ती काल परवाची
पाया बनली मम जीवनाची
भीड मुरडली उभ्या जगाची
दिशा गवसली मला उद्याची

राजने नेहाकडे पाहिले, ती कुठेतरी हरवली होती.

राजच्या आलिशान गाडीने लवकरच मध्यवस्ती सोडली आणि गाडी एका आलिशान फाइवस्टार हॉटेलपाशी येऊन थांबली.

राजने बुक केलेल्या प्रशस्त सुटमध्ये ते गेलेत. राजने दोघांसाठी कॉफी मागवली. कॉफी आणणाऱ्या मुलाच्या कानात राज काहीतरी कुजबुजला, हे नेहाच्या चाणाक्ष नजरेतून सुटले नाही.

गप्पा मारता मारता कॉफी संपली. राज सर अजून कोणीच आले नाही, कोण कोण येणार आहेत पार्टीला? काय वेळ दिली आहे तुम्ही त्यांना? रीना ताई येणार आहे का? आणि तुमची ती खास मैत्रीण पण येणार आहे का? नेहाने विचारले. कोणीही येणार नाही फक्त आपण दोघेच, राज म्हणाला.

तेवढ्यात लाईट गेलेत.

सर आपण बाहेर रिसेप्शन मध्ये जाऊन बसुया, नेहा म्हणाली. लाईट इतक्यात येतीलच, मोठ्या हॉटेल्स मध्ये जनरेटर असतो, राज म्हणाला.

नेहा चल आपण आत जाऊया, तीचा हात घट्ट पकडत राज म्हणाला.

आत कुठे? घाबरलेल्या नेहाने विचारले.

तुझ्यासाठी छान सजवलेल्या बेडरूममध्ये, राज म्हणाला.

नको नको, नेहा ओरडून म्हणाली.

नेहा विरोध करत होती तरीही राजने जवळ जवळ ओढतच तीला बेडरूममध्ये नेले. नेहा खुप घाबरली होती, थरथरत होती, तीच्या तोंडातून एक शब्दही बाहेर पडत नव्हता. सगळे काही अनपेक्षित होते, राजवर नको तेवढा विश्वास टाकून, ऑफिसातील मैत्रीणीला अर्धसत्य सांगून ती राज बरोबर आली होती.

तेवढ्यात लाईट आलेत. बेडरूम खरोखरच खूप छान सजवली होती. प्रशस्त वातानुकूलित रुम, भिंतींवर मोहक गुलाबी रंग, छानसा ड्रेसिंग टेबल, मंद प्रकाश देणारे रंगीबेरंगी दिवे, हलकेसे संगीत, पांढरा स्वच्छ सोफा, किंग साईज बेड, गुबगुबीत उशा नी जाडजूड ब्लँकेट. सर खूप व्यवस्थित प्लॅन करून फसवलेत मला. वाटलं नव्हतं तुम्ही इतके नीच असाल म्हणून, नेहा ओरडून म्हणाली.

नेहाच्या ओरडण्याकडे दुर्लक्ष करत राजने पडद्यामागून काचेचा टीपॉय ओढला.

टीपॉयवर होता हॅपी बर्थडे नेहा असे लिहिलेला छानसा केक. इतकी कल्पकता आणि प्लॅनिंग! नेहा अवाक झाली. राज बद्दल करून घेतलेल्या गैरसमजातून त्याला नीच म्हटल्यामुळे नेहा मनोमनी शरमली. सर, प्लीज माफ करा मला, नेहा ओशाळून म्हणाली. नेहाचे पाणावलेले डोळे राजने रुमालाने पुसलेत.

सर रागावलात?

छे छे, मुळीच नाही. पुढे मागे लग्न करणार, तेव्हा असे खोचक बोलणे ऐकायची सवय करावीच लागणार.

सर, तुमच्या त्या खास मैत्रीणीला भेटण्याची उत्सुकता आहे मला. कधी भेटवाल?

लवकरच, राज म्हणाला.

नेहाच्या खांद्यांवर थोपटत राज म्हणाला, कम ऑन नेहा, आता केक कापूया का?

नेहाने केक कापला. प्रथम राजने नेहाला आणि नंतर नेहाने राजला केक भरवला.

राजने दिलेला गिफ्ट बॉक्स उघडून नेहा ओरडली. सर काही तरी चूक झाली. ही तुमच्या खास मैत्रीणी साठी घेतलेली साडी तुम्ही मला देताय.

खरंय नेहा, ती मैत्रिण आता मैत्रिण राहिली नाही. तीला कोणीतरी मागणी घालणार आहे.

पण सर, तीचेही तुमच्यावर प्रेम असेल ना?

नेहा तेच तर माहीत नाही मला.

सर, बी क्विक, विचारा तीला. वेळ वाया घालवू नका, नंतर आयुष्यभर पश्चात्ताप करावा लागेल.

राजने नेहाचा हात हातात घेत विचारले, देशील का हा हात मला कायमचा? होशील का माझी?

आणि हो, तुच ती माझी खास मैत्रीण, पहिल्या भेटीतच आवडलेली. तुझ्या पसंतीची ही साडी मी तुझ्यासाठीच घेतली. काय सुंदर दिसत होतीस तू या साडीत! हा बघ याच साडीतील तुझा फोटो, तुला न विचारता काढलेला.

नेहा नि:शब्द होती पण तीच्या आनंदाश्रूंनी दिलेले उत्तर, हेच राजला मिळालेले रिटर्न गिफ्ट होते.

राज गुणगुणत होता -

भेट तुझी ती काल परवाची
पाया बनली मम जीवनाची
भीड मुरडली उभ्या जगाची
दिशा गवसली मला उद्याची

राज अरे, दिशा उद्याची नाही तर उभ्या आयुष्याची गवसली. प्रथमच सरांना, अरे राज संबोधत नेहाने रिटर्न गिफ्टची गोडी अजूनच वाढविली होती.

## ठाकरे गटही क्शन मोडमध्ये, विधानसभेसाठी

# ‘स्टार’ प्रचारकांची यादी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.१ मुंबई** - उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आता राज्यात विधानसभेसाठी प्रचाराची सुरुवात झाली आहे. प्रत्येक पक्षाकडून आपल्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर होत आहे. आज ठाकरे गटाकडून आपल्या २४ स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीमध्ये उद्धव ठाकरे यांच्यासह संजय राऊत आदित्य ठाकरे यांच्या नावांचा समावेश करण्यात आला आहे.

माहितीनुसार, महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी उद्धव ठाकरे ०५ नोव्हेंबरपासून प्रचाराची सुरुवात करणार आहे तर ०६ नोव्हेंबरला लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी (ठर्हीश्र ऋ्रपवहळ) मुंबईमध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारांसाठी जाहीर सभा घेणार आहे. विधानसभा निवडणुकीसाठी ठाकरे गटाकडून ९० पेक्षा जास्त उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. तर काँग्रेसने १०० पेक्षा जास्त उमेदवार दिले आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून ५० पेक्षा जास्त उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये यावेळी महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये मुख्य लढत पाहायला मिळणार आहे. राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी एकाच टप्प्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे तर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. सध्या महाविकास आघाडी आणि महायुतीकडून विधानसभा निवडणुकीत जिंकण्याचा दावा करण्यात येत आहे.

### शिवसेना (ठाकरे गट) स्टार प्रचारकांची यादी


| | |
|---|---|
| ०१. उद्धव ठाकरे | १३. सुषमा अंधारे |
| ०२. आदित्य ठाकरे | १४. संजय (बंडू) जाधव |
| ०३. संजय राऊत | १५. किशोरी पेडणेकर |
| ०४. अरविंद सावंत | १६. ज्योती ठाकरे |
| ०५. भास्कर जाधव | १७. संजना घाडी |
| ०६. अनिल देसाई | १८. जान्हवी सावंत |
| ०७. विनायक राऊत | १९. शरद कोळी |
| ०८. आदेश बांदेकर | २०. ओमराज निंबाळकर |
| ०९. अंबादास दानवे | २१. आनंद दुबे |
| १०. नितीन बानुगडे पाटील | २२. किरण माने |
| ११. प्रियांका चतुर्वेदी | २३. प्रियांका जोशी |
| १२. सचिन अहिर | |

# पर्यावरणपूरक पद्धतीने करा दिवाळी साजरी

## महापालिकेचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती** - दीपावलीचा उत्सव साजरा करताना नागरिकांनी हवेचे तसेच ध्वनिप्रदूषण होणार नाही, याची काळजी घेत पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करावा, असे आवाहन अमरावती महापालिकेने केले आहे. दिवाळी हा दिव्यांचा उत्सव असून फटाके वाजवून ध्वनिप्रदूषण टाळावे, असे प्रशासनाने म्हटले आहे.शहरातील विविध भागांमध्ये दिवाळीनिमित्त मोठ्या प्रमाणात फटाके वाजविले जातात. फटाक्यांची आतषबाजी केल्याने वायुप्रदूषण होते. याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असल्याचे दिसून आलेले आहे. हे प्रकार टाळून सुरक्षितपणे दिवाळीचा उत्सव साजरा करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेऊन हा उत्सव साजरा करावा, असे पालिकेने म्हटले आहे.आनंदाच्या या उत्सवात विनाकारण उडविण्यात येणाऱ्या फटाक्यांमुळे होणारे ध्वनिप्रदूषण हे नागरिकांसह इतर प्राण्यांसाठी हानिकारक आहे. त्यामुळे सर्वांनी काळजी घ्यावी, असे आवाहन देखील पालिकेने केले आहे.दिवाळीच्या काळात वाजविण्यात येणाऱ्या फटाक्यांमुळे विविध श्वसनाचे आजार होत असल्याचे समोर आले आहे. अनेक फटाक्यांचा आवाज अत्यंत मोठा असल्याने बहिरेपणा सारख्या समस्यांना देखील नागरिकांना तोंड द्यावे लागते. काही उत्साही नागरिकांच्या आणि तरुणाईच्या चुकीमुळे अनेकांना सणासुदीच्या काळात रुग्णालयाची पायरी चढावी लागते.







# खड्डे जेवण निमंत्रण

आपल्या रोजच्या समस्यांकडे शासनाचे आणि विशेषत: संबंधित शासकीय यंत्रणांचे लक्ष वेधून घेण्यासाठी जनता विविध प्रकारे आंदोलन करत असते. कोणत्याही जिल्ह्याच्या कलेक्टर ऑफिसच्या बाहेर तुम्ही कधीही जाल, तर उपोषणकर्त्यांचे तंबू तुम्हाला सहज पाहायला मिळतील. कधी अधिकार्यांना घेराओ घालणे, पन्नासेक लोकांनी एकत्र येऊन ठिय्या आंदोलन करणे, साखळी उपोषणे करणे नेहमीचेच आहे. अगदी साधे आंदोलन असेल, तर कपाळाला किंवा शर्टवर काळी पट्टी बांधून काम करणे असे प्रकार होत असतात. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुका आजकाल अभिनव पद्धतीच्या आंदोलनांसाठी महाराष्ट्रभर प्रसिद्ध झाला आहे. मुख्य रस्त्यावर पडलेल्या भल्या मोठ्या खड्ड्यांसाठी येथील युवकांनी शासनाकडे पैसे नाहीत म्हणून भीक मागून आंदोलन करून १०-१० रुपये जमा केले होते आणि जमा झालेल्या रकमेतून खड्ड्यांवर मुरूम टाकून काही प्रमाणात लोकांची सुटका केली होती. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुका हा निजामाच्या विरुद्ध झालेल्या सशस्त्र लढाईमध्ये एक धगधगती रणभूमी होती. सर्वात अधिक स्वातंत्र्यसैनिकांची संख्या असलेला तालुका म्हणूनही या परिसराची ओळख आहे. साहजिकच येथील जनता लढाऊ बाण्याची आहे.एखादी व्यक्ती मरण पावली, तर त्याच्या घरातील लोकांकडून तेराव्या किंवा चौदाव्या दिवशी गोड जेवण घातले जाते. अंत्यविधीला उपस्थित असणारे आणि नजीकचे नातेवाईक असणारे लोक गोड जेवण कार्यक्रमाला निमंत्रित असतात. या तालुक्यातील येलदरी ते जिंतूर हा साधारण १५ किलोमीटरचा रस्ता अक्षरश: चाळण झालेला आहे. या रस्त्यावर भीषण अपघात होऊन कित्येक लोक मृत्यू पावलेले आहेत आणि असंख्य लोक जायबंदी झाले आहेत. लोकांच्या पाठींना मणक्याचे आजारही झालेले आहेत. या जीवघेण्या रस्त्यासाठी आंदोलन करणार्या युवकांनी या पंधरा किलोमीटर रस्त्यावरवरील खड्डे मोजले असता त्यांची संख्या पंधराशे एक अशी भरली. पंधराशे एक संख्या झाल्याबरोबर या युवकांनी चक्क 'खड्डे जेवण निमंत्रण पत्रिका' छापली असून या आनंदात या रस्त्यावरून ये-जा करणार्या प्रवाशांना विशिष्ट दिवशी आम्ही अल्पोपहार देणार आहोत, यासाठी जरूर या, असे आग्रहाचे निमंत्रण दिले आहे. येणार्या लोकांना या रस्त्यावर जास्तीत जास्त खड्डे कसे पडतील, यासंदर्भात मार्गदर्शन करण्याची विनंतीपण केली आहे. अल्पोपहाराची वेळ दुपारी दोन ते चार असून माणकेश्वर या गावाजवळील सर्वात मोठा खड्डा हे या कार्यक्रमाचे स्थळ आहे. आहे की नाही अभिनंदन करण्याची अभिनव पद्धत! इतकी आंदोलनाची वेळ येते, तरीही यंत्रणा ढिम्म असतात आणि याची दखल घेतील याची खात्री नसते. 'रोज मरे त्याला कोण रडे' या पद्धतीने त्या रस्त्यावरून ये-जा करणारे नागरिक आपली वाहने सर्कसमध्ये चालवल्यासारखी चालवत 'जिणे जगावे लाजिरवाणे' अशा पद्धतीने जगत असतात. शासकीय यंत्रणा तातडीने जाग्या होऊन या रस्त्याच्या अवस्थेची दखल घेतील आणि भविष्यात अशी आंदोलने करण्याचे काम पडू देणार नाहीत, यासाठी आपण केवळ प्रार्थना करू शकतो.

## शाल

(पान ४ वरुन) बाजूला ठेवून एक स्वेटर घ्यायचं हा विचार तिने पक्का केला मनाशी.

सगळं झाकपाक करून, स्वत: दोन घास खाऊन ती निघाली. खोलीत जाऊन वेणी घातली साडी बदलवली, पण सासूबाई अजूनही पलंगावरून उठायला तयार नव्हत्या. चीड दाटली मनात. त्या काही अपंग नव्हत्या पण अजिबात हालचाल करायला तयार नसायाच्या.

येते मी.

इतकं त्रोटक वाक्य ती बोलली. तिला जाणवलं की कालच्या संध्याकाळ पासून आपल्याही तोंडून हे दोनच शब्द निघाले आहेत. अश्याने आपण बोलणं विसरून जाऊ का असाही विचार तिच्या मनात आला.

थांब जरा.

आता काय?

चिडखोर नजरेने त्यांच्याकडे बघत ती थांबली.

काल उशिरा पर्यंत ती फाटकी ओढणी शिवत बसलीस. त्याने तुझी काय थंडी जात असेल?

ही घे शाल घेऊन जा. मला घरात आहेत बरेच पांघरूण. फक्त घरी आल्यावर मात्र मला देत जा. कारण ही मला पहिल्या पगारात आणली होती न तुझ्या नवऱ्याने.

त्याचा सुगंध आहे आहे शालीत. बाकी काही नाही.

तिचे टचकन भरून आलेले डोळे गालावर ओघळायच्या आधी त्या पुन्हा पलंगावर जाऊन बसल्या. तिच्याकडे पाठ करून. हातातल्या शालीकडे बघतांना तिला जाणवलं की आज घरी यायला एक कारण तरी आहे आपल्याजवळ. ही शाल घरी आल्यावर सासूबाईंना परत करावी लागेल न? त्यासाठीशाल तरी आज घरी येणं निरर्थक वाटणार नाही.

डोळे कोरडे केले तिने.

येते इतकं म्हणलं आणि त्यांच्याकडे न बघता ती निघाली. आज तिला हक्काची जागा मिळाली होती. घरी येताना जीव नकोसा होणार नव्हता



# सुंदर ते ध्यान

सकल महाराष्ट्राचे प्रमुख दैवत पंढरीचा राणा अर्थातच पांडुरंग आहे.संत ज्ञानदेव,संत नामदेव,संत तुकाराम इत्यादी सर्वच संत श्रेश्ठांची अशी धारणा आहे की,संत पुंडलिकाच्या भक्ती प्रेमाला वश होऊन परब्रह्म पांडुरंग पंढरपुरास विटेवर येऊन उभे राहिले आहे.तसे या संत श्रेष्ठींनी आपापल्या अभंगात नमूद केले आहे .

संत ज्ञानेश्वर - पुंडलिकाच्या भावार्थ ! गोकुळा हून जाता येतो.!!

संत नामदेव - पुंडलिका भावे बोलले ओरसे! नेणो काय कैसे प्रेम त्याचे!!

संत तुकाराम - भक्तामाजी अग्रगण्य ! पुंडलिक महामुनी ! त्याच्या प्रसादे तरले! जडाजिव उध्दरीले !!तोची प्रसाद आम्हासी!!

विठ्ठल म्हणजेच पांडुरंग पंढरपुरास कसा आला.त्याची पार्श्वभूमी तुकारामांना माहित असल्याने तुकाराम विठ्ठलाच्या भेटीची आस धरून बसले होते.ते विठ्ठलास अळवतात.वाटूली पाहता , सिणले डोळुले! दविसी पाऊले कै वो डोळा!!तू माय माऊली कृपेची सावली!विठ्ठले पहिली आस तुझी!!

तुकाराम पुढे म्हणतात, तुका म्हणे अवघे जग! सर्वा घटी पांडुरंग!!

तुकारामाच्या मते पांडुरंग/ नारायण व भक्त असे दोन देह आहेत.पण दोघांचा जीव एकच आहे. नारायणामुळे च भक्त जगतो.त्यामुळे नारायणा पासून भक्त वेगळे नाहीतच.तुकाराम महाराज म्हणतात,मी वेगळा उरूच नये,मी पूर्णपणे विठ्ठलात विलीन व्हावे.याच्करिता माझे सर्वच सायास होते.ते सफल झाले.पंढरीच्या राणाशी झालेली एकरूपता तुकाराम व्यक्त करतात.

जया पासोनी सकळ!महामंडळ हे झाले!!

तो एक पंढरीचा राणा! नये अनुमाना श्रूतिशी!!

विवादता जयासाठी! जगजेठी तो विठ्ठल!!

तुका म्हणे तो आकळ! आहे सकळ व्यापक !!

सर्व विश्वात अनुस्युत जे एक आत्मतत्व व्यापून आहे.तेच परब्रह्म विटेवर आहे.ज्याच्यापासून हे सर्व पृथ्वी मंडळ निर्माण झाले आहे.तो पंढरीचा राणा आहे.श्रुतीला त्याचेअनुमान करता आले नाही.ज्याच्या स्वरूपाविषयी शस्त्रे वादविवाद करीत आहेत ,तो जगजेठी विठ्ठल आहे.

तुकाराम पांडुरंगाला विठ्ठल म्हणतात.आणि हरी,परब्रह्म, नारायण, विष्णू, देव, गोविंद,विश्वंभर, जगदीश, जगदीश्वर, अशा विविध नावांनी संबोधतात.

तुकारामांनी पांडुरंगाला सगुण रुपात पाहिले आणि ते पांडुरंगाच्या प्रेमात पडले.त्या सुंदर सगुण रुपावर, त्या ध्यानावर त्यांनी अत्यंतिक प्रेम केले.

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी! कर कटावरी ठेवूनिया!!

तुळशीहार गळा कासे पितांबर! आवडे निरंतर हेचि ध्यान!!

मकरकुंडले तळपती श्रावणी! कंठी कौस्तुभ मणी विराजित!!

तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख! पाहीन श्रीमुख आवडीने!!

तुकारामांनी स्पष्ट च सांगितले आहे की तुकरामाला पांडुरंगाचे हेच स्वरूप प्रिय आहे.तुकारामाला हे श्रीमुख आवडीने पाहायला आवडते.त्यातच त्यांना सुख मिळते.तुकारामांनी सगुण भक्ती केली.त्या भक्तिमुळेच त्यांना आत्मोन्नती साधता आली.तुकाराम मूर्तिपूजक होते.त्यांनी जीवनभर विठ्ठलाची आराधना केली. सगुणाची उपासना म्हणजे ईश्वप्राप्तीसाठी सर्व प्रमुख साधनेतील प्रमुख साधन आहे.ते साधन तुकारामानी वापरले.त्यांचा हृदयस्थ शुध्द भाव जाणून हृदयस्थ परमात्म्याने प्रकट होऊन तुकारामाला दर्शन दिले.

समचरण दृष्टी विटेवर साजिरी! तेथे माझी हरी वृत्ती राहो!!

तुकारामांनी विटेवर उभा असलेल्या पांडुरंगाच्या समचरणाकडे आपली दृष्टी ठेवून आपले चित्त दृढ केले.

सगुण मूर्तीवर प्रेम केल्याने तुकारामाना अभिनव सुख लाभले. म्हणून इतरांनीही या गोष्टीचा प्रामुख्याने विचार करावा.असे संत तुकाराम आपल्या स्वानुभवाने सांगतात.कारण देवाच्या रूपाचा आठव जरी केला तरी दोन्ही ही आपणच होतो.मग क्षणभरही त्याचा वियोग होत नाही.चित्तात ब्रह्मानडाचे चिंतन करावे ही खरी पूजा आहे.असे तुकाराम सांगतात.हरी व्यापक आहे असाच तुकारामाना अनुभव प्राप्त झाला.त्या स्वानुभवातून तुकारामांनी हरीच्या पायावर डोके डोके ठेवले आहे.

तुकारामांनी पांडुरंगाची सगुण मूर्ती आपल्या मनात साकारल्याने त्या सगुण मूर्तीतील पांडुरंग त्यांना जसा भासला तसा त्या त्या रूपाच्या विविध छटातून तुकारामांनी पांडुरंगाला साकारले. त्याच्या अंतरयामी ठाण मांडून बसलेल्या पांडुरंगाच्या सगुण मूर्तीच्या दर्शनाच्या एकमेव अशा विचाराने तुकाराम रात्रंदिन परमेश्वराची आळवणी करू लागले.तुकारामाच्या इच्छेनुसार आणि सगुण भक्तीमुळे त्यांना प्रसाद प्राप्त झाला.आणि चित्ताला समाधान झाले.

पावलो प्रसाद इच्छा केली तैसी! जाले या चित्तासी समाधान.

पांडुरंग जणू मायबाप होऊन विटेवर चरण कमळ सारखे जोडून तुकारामा वर कृपेचे दान करण्यासाठी उभा असल्याने तुकारामाचा सांभाळ करण्यात त्याने कोणतेही कसूर केली नाही.काहीच कमी पडू दिले नाही.सगुण भक्तीमुळेच तुकाराम उच्च आनंदाला पात्र ठरले.

तुकारामांना घरीच वैकुंठ पीठ आल्याचा साक्षात्कार झाला.त्या पिठाचा पिठाधिश म्हणजे नारायण.हा नारायण माणिकाच्या कोंदणात हिरा जसा शोभून दिसावा तसा शोभून दिसत होता. त्या नारायणाच्या मुखी पौर्णिमेच्या चंद्राच्या सर्व कलानी प्रकाशित होणाऱ्या कोट्यवधी चंद्राचा प्रकाश पडून त्या तेजात त्यांचे मुख उजळून निघाल्याने आनंदमय दिसत होते.

तो आनंदाचा क्षण हे तो वाचे बोलवेना! काय सांगो नारायणा!!

या सुंदर ध्यान असलेल्या तेज:पुंज साक्षात्काराच्या अनुभवानंतर तुकारामाच्या वृत्तीत कमालीचा फरक झाला.मूळच्या सांसारिक वृत्ती बदलल्या.अश्ट सात्विक भव प्रकटले . दृष्टीपुढील शंकांचा अंधकार नाहीसा झाला.सर्वत्र तेज दिसू लागले.आनंदाच्या उर्मी जागृत झाल्या.उपनिषदात यालाच शुभ्र ज्योतीअसे वर्णिले आहे.तत शुभ्रम् ज्योतिषाम ज्योती! तद्यत आत्मविदो विद्:!!

सुंदर ते ध्यान.......डोळयात साठवून ईश्वराच्या साक्षात दर्शनाने तुकारामाच्या अंतरंगी आनंदाने डोह निर्माण झाले आनंदाचे डोही आनंद तरंग या स्वानुभवा मुळे त्याच स्थितीत राहावे असे वाटू लागले. ईश्वर भेटीची आस पूर्ण झाल्याने ते अतिशय शांत झाले.सुंदर ते ध्यान ..कायम आपल्या हृदयात साठवून ते सर्वांना सांगतात,यांसाठी केला होता अट्टाहास! शेवटचा दिस गोड व्हावा!!



ग्रामगीताचार्य
डॉ शोभा गायकवाड
अमरावती
९४२३२७९४३२








# दि. अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँक लि.

कॉंग्रेस नगर रोड रेल्वे पुलाजवळ अमरावती
फोन नं. ०७२१-२६७४६८४ फॅक्स नं. ०७२१-२६७१०४३
Email - amtzpteacherbank@gmail.com
Website - www.zpshikshakbankamt.com

- सर्व शाखा संगणकीकृत, सी. बी. एस. व्दारा सेवा उपलब्ध.
- मोबाईल बँकींग, फोन पे., गुगल पे., ए.टी.एम., आर.टी.जी.एस / एन.ई.एफ.टी., आय.एम.पी.एस., एन.ए.सी.एच. बी.बी.पी.एस., सी.टी.एस. क्लिअरींग ची सेवा उपलब्ध.
- बँकेचे कामकाज रविवार पूर्ण वेळ विनम्र व तत्पर सेवा ( आठवडी सुटी बुधवार तसेच दुसरा व चौथा शनिवार बँके बंद राहील.)
- KYC Norms पुर्ण करुन कोणालाही खाते उघडण्याची सोय.
- ठेवीवर सर्वाधिक व्याज, सातत्याने ऑडिट वर्ग-अ-
- सेफ डिपॉझिट लॉकर्सची सेवा, ५ लाखापर्यंत ठेवीला विमा संरक्षण,
- सर्वाकरीता आकर्षक व्याज दरात आवर्ती ठेव योजना (आर.डी.)
- मुदत ठेवीवर जेष्ठ नागरिकांना ०.५० % जादा व्याजाची सवलत.

३१ मार्च २०२४ चे स्थितीवर दृष्टिक्षेपात बँक

(आकडे लाखांत)

| | | | |
|---|---|---|---|
| भागभांडवल | ५११९.८० | एकूण व्यवसाय | ९८७४२.२३ |
| एकूण ठेवी | ६०६२३.०७ | सी.आर.ए.आर. | २१.०६% |
| निव्वळ नफा | ६४५.३१ | नेट एन.पी.ए. | १.५०% |
| एकूण कर्ज | ३८११९.२१ | ऑडिट वर्ग | 'अ' |

गोकुळदास श्री. राऊत — अध्यक्ष
मो. नाजीम अ. गफ्फार — उपाध्यक्ष
राजेश प्र. देशमुख — सरव्यवस्थापक

मा. संचालक सर्वश्री. तुळशिदास मु. धांडे, प्रफुल्ल वि. शेंडे, सुरेंद्र वि. मेटे, कैलास मा. कडू, उमेश उर्फ उत्तम रा. चुनकीकर, अजयानंद स. पवार, रामदासजी शे. कडू, राजेंद्र ना. गावंडे, मनिष र. काळे, विजय प्र. कोठाळे, संभाजी श्री. रेवाळे, राजेश प्र. गाडे, सौ. सरिता दि. काठोळे, सौ. संगिता शा. तडस, ॲड. श्री. राजपाल काशिराम वानखडे (तज्ञ संचालक), ॲड. मो. शकील अहमद मो. गयास (तज्ञ संचालक)

बँकेच्या सर्व सभासदांना, खातेदारांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा